


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १३१ * नांदेड * सोमवार, दि. १८ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# नीट पेपर फुटीचे नांदेड कनेक्शन!

- एका हॉटेल व्यावसायिकाची सीबीआयकडून चौकशी
- मंगळवारी पुणे येथे चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश
- मुलीसाठी ५ लाख रुपयांत पेपर खरेदीचा संशय

**नांदेड (प्रतिनिधी)** –देशभर सध्या गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता लातूरनंतर नांदेडपर्यंत येऊन पोहोचले आहेत. केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) शनिवार, दि. १६ मे रोजी शहरातील विद्युतनगर परिसरात धडकले. सीबीआयच्या विशेष पथकाने कैलास कदम कुटुंबियांच्या आशा रेसिडेन्सी येथील निवासस्थानी तब्बल आठ तासांहून अधिक वेळ झाडाझडती घेत सखोल चौकशी केली. या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. यासोबतच अन्य एक पालक सीबीआयच्या रडारवर असल्याचे सांगण्यात आले आहे.



सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, शहराच्या आयटीआय परिसरात हॉटेल व्यावसायिक असलेल्या कैलास कदम यांनी आपल्या मुलीसाठी नीट परीक्षेचा प्रश्नपत्रिका संच तब्बल पाच लाख रुपयांत विकत घेतल्याचा संशय तपास यंत्रणेला होता. या अनुषंगाने सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी सकाळीच विद्युतनगर भागातील त्यांच्या फ्लॅटवर छापा टाकला. घरातील विविध कागदपत्रे, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरणे तसेच आर्थिक व्यवहारांशी संबंधित दस्तऐवजांची बारकाईने तपासणी करण्यात आली.

या चौकशीदरम्यान सीबीआयने कदम कुटुंबियांना पेपर नेमका कुठून मिळाला, कोणामार्फत संपर्क झाला, व्यवहार कधी आणि कुठे झाला यासंदर्भात अनेक प्रश्न विचारले. तपास पथकाने घरातील प्रत्येक सदस्याची स्वतंत्र चौकशी केल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, शुक्रवारी लातूरमध्ये आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक मोटेगावकर या नामांकित कोचिंग क्लास चालकाची चौकशी केल्यानंतर सीबीआयचे पथक थेट नांदेडमध्ये दाखल झाले होते. त्यामुळे पुणे- लातूर- नांदेड असा नीट पेपरफुटीचा संभाव्य नेटवर्क तपास यंत्रणेसमोर उलगडत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

या प्रकरणात पुढील चौकशीसाठी कदम कुटुंबियांना मंगळवारी पुणे येथील सीबीआय कार्यालयात हजर राहण्याचे समन्सही बजावण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# रशियन तेल खरेदीची सूट अमेरिकेकडून रद्द, भारतात पेट्रोल आणि डिझेलचे दर पुन्हा वाढण्याचे संकट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षामुळं जगभरातील तेल पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. अमेरिकेनं हल्ला केल्याने इराणकडून होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला. मात्र, अमेरिका आणि इराण यांच्यात शस्त्रसंधी झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी दबावतंत्राचा वापर म्हणून होर्मुझची नाकेबंदी केली. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाच्या काळात रशियन तेल खरेदीवर अमेरिकेकडून सूट देण्यात आली होती. मात्र, आता डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियन तेल खरेदीवर दिलेली सूट वाढवण्यास नकार दिला आहे. यामुळं पेट्रोल आणि डिझेल यासह इतर इंधनांचे दर वाढू शकतात. कच्च्या तेलाच्या दरात वाढ झाल्यानं भारतासह जगभरात महागाई वाढण्याचं संकट वाढलं आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनानं रशियन तेल खरेदीवर दिलेली अस्थायी सूट वाढवण्यास नकार दिला आहे. आता ही सूट रद्द झाली आहे. हा भारतासाठी मोठा धक्का मानला जातोय. आखाती देशातील संकट आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तणावामुळं भारत रशियाकडून सातत्यानं तेल खरेदी करीत आहे.



रशिया जगातील कच्च्या तेलाच्या निर्यातदार देशांपैकी एक आहे. अमेरिकेच्या या निर्णयानंतर जागतिक बाजारात तेलाचा पुरवठा प्रभावित होऊ शकतो. जगभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात आणि इतर इंधनाच्या दरात वाढ होऊ शकते. तज्ज्ञांच्या मतानुसार जर कच्च्या तेलाचे दर दीर्घकाळ वाढलेले राहिल्यास याचा थेट परिणाम सर्व-सामान्य लोकांच्या खिशावर पडू शकतो.

रशिया आणि यूक्रेन यांच्यातील युद्धानंतर अमेरिका आणि यूरोपियन देशांनी रशियावर कठोर निर्बंध लादले होते. मात्र, मार्च २०२६ मध्ये इराण युद्ध सुरु झाल्यानं आणि होर्मुझ बंद झाल्यानं जागतिक बाजारात तेल संकट गडद झालं आहे. तेलाच्या तुटवड्या-मुळे ट्रम्प सरकारनं मार्च २०२६ मध्ये सूट दिली होती, ती सूट १६ मे पर्यंत वाढवण्यात आली आहे. ही सूट त्या तेलाच्या पुरवठ्यावर होती, जी पहिल्यापासून टँकरमध्ये लोड केलेलं होतं.

अमेरिकेने रशियन तेल खरेदीवर दिलेली सूट रद्द करावी यासाठी यूरोपियन देश आक्रमक झाले होते. रशिया तेल विक्रीतून मिळालेल्या पैशांचा वापर यूक्रेनविरोधात करीत असल्याचा दावा यूरोपियन देश करत आहेत. या दबावामुळं ट्रम्प प्रशासनाकडून शनिवारी रशियन तेलावरील सूट रद्द केली.

रिपोर्टनुसार मार्च २०२६ मध्ये होर्मुझच्या सामुद्रधुनीवरुन तणाव वाढल्यानं भारतानं रशियाकडून तेल खरेदी वाढवली होती. मार्च २०२६ मध्ये प्रतिदिन साडेचार दशलक्ष बॅरल तेल आयात केलं होतं. यामध्ये जवळपास ५० टक्के तेल रशियाकडून खरेदी केलं होतं. एप्रिलमध्ये भारतानं रशियाकडून सर्वाधिक तेल खरेदी केलं. मात्र, ते मार्चच्या तुलनेत एप्रिलमध्ये २० टक्क्यांनी कमी होतं.

# जिल्ह्यात निवडणुकीतील भाजपची विजयी घोडदौड कायम ठेवण्यासाठी अधिक ऊर्जेने कामाला लागा -खा. अशोकराव चव्हाण





## पं. दीनदयाळ उपाध्याय जिल्हा प्रशिक्षणाचे उद्घाटन; आज समारोप

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय जनता पक्ष हा शिस्तीचा पक्ष आहे. संघटन हीच शक्ती या तत्त्वाला मानणारा पक्ष आहे. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमध्ये भाजपने चांगले यश मिळविले आहे. मजबूत बूथ रचना आणि कार्यकर्त्यांचा थेट जनसंपर्क यामुळेच आपण नांदेडमध्ये इतिहास घडवू शकलो आहोत. त्यामुळे ही घोडदौड कायम ठेवण्यासाठी या प्रशिक्षण वर्गातील ज्ञानाचा प्रत्यक्ष मैदानात वापर करा. प्रशिक्षणातील प्रत्येक सत्र बारकाईने समजून घ्या, आपल्या शंकांचे निरसन करून घ्या आणि अधिक ऊर्जेने मतदारसंघात कामाला लागा, असे आवाहन खा. अशोकराव चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना केले.

नांदेड महानगर भाजपच्या वतीने पिंपळगाव महादेव येथे आयोजित पं. दीनदयाळ उपाध्याय जिल्हा प्रशिक्षण अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी ते रविवारी (दि.१७) बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, भाजपाच्या महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा आ. चित्रा वाघ, माजी मंत्री डी. पी. सावंत, नांदेड भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पांडे, भाजपाचे महानगराध्यक्ष तथा आयोजक अमरनाथ राजूरकर, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष अ‍ॅड. चैतन्यबापू देशमुख आदी उपस्थित होते.

खा. अशोकराव चव्हाण यांनी उद्घाटनपर भाषणात सांगितले की, भारतीय जनता पार्टी हा कार्यकर्त्यांच्या शिस्तीवर आणि मजबूत विचारसरणीवर चालणारा पक्ष आहे. त्यामुळे (पान ६ वर)

# जरांगेंचे समाधान होत असेल तर राजीनाम्यास तयार -विखे पाटील

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा राज्यातील राजकारण तापलं असून, मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला थेट इशारा दिला आहे. राज्य सरकारने २९ मेपर्यंत मराठवाड्यातील मराठा समाजातील पात्र नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे, अन्यथा ३० मेपासून आमरण उपोषणाला बसणार असल्याची घोषणा जरांगे यांनी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून ते सातत्याने ही मागणी लावून धरत असून, सरकारवर दबाव वाढवण्यासाठी त्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचं पाहायला मिळत आहे.



या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर जरांगे यांनी जोरदार टीका केली होती. त्यानंतर आता विखे पाटील यांनी मोठं वक्तव्य करत, मी पदाला चिकटून बसणाऱ्यांपैकी नाही. माझ्या राजीनाम्याने मनोज जरांगे पाटील यांचे समाधान होत असेल, तर मी उपसमितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यायलाही तयार आहे, असं स्पष्टपणे म्हटलं आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून, आता यावर मनोज जरांगे काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सरकारने मराठा समाजाला दिलेल्या आश्वासनांबाबत कुठेही कमी पडलेलो नसल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला. मराठा आरक्षणासंदर्भात सरकारने घेतलेल्या कोणत्याही निर्णयाला आजपर्यंत न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे सरकार योग्य दिशेने काम करत आहे, असे विखे पाटील म्हणाले.

# युक्रेनचा रशियावर हल्ला; एका भारतीयासह ४ जणांचा मृत्यू

**मॉस्को (वृत्तसंस्था)** – युक्रेनने शनिवारी रात्री रशियाच्या अनेक भागांवर १००० हून अधिक ड्रोनने हल्ला केला. अहवालानुसार, यात किमान ४ लोकांचा मृत्यू झाला आहे. यात १ भारतीय मजुराचाही समावेश आहे. रशियातील भारतीय दूतावासाने ही माहिती दिली.

दूतावासाच्या माहितीनुसार, काही लोक जखमीही झाले आहेत. अधिकाऱ्यांनी हल्ल्याच्या ठिकाणाला भेट दिली आणि रुग्णालयात दाखल जखमींची भेटही घेतली. अद्याप मृत आणि जखमी लोकांची ओळख सार्वजनिक करण्यात आलेली नाही.

कीव इंडिपेंडन्सच्या अहवालानुसार, युक्रेनने मॉस्को परिसरात लष्करी आणि इंधनाशी संबंधित महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य केले. यात एंगस्ट्रेम प्लांटचा समावेश आहे, जो रशियन सैन्यासाठी सेमीकंडक्टर बनवतो. याशिवाय, मॉस्को ऑइल रिफायनरी, सोलनेचनोगोर्स्क आणि वोलोडार्स्कोये इंधन स्टेशनलाही लक्ष्य करण्यात आले.

# जागतिक आरोग्य संघटनेने जगभर जाहीर केला ईबोला अलर्ट

**काँगो (वृत्तसंस्था)** – डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो आणि युगांडामध्ये इबोला विषाणूने धुमाकूळ घातला आहे. आतापर्यंत ईबोला विषाणूमुळे ८८ मृत्यू झाले आहेत. धोकादायक इबोला विषाणूची बाधा झालेले नवे ३०० पेक्षा जास्त रुग्ण आढळले आहेत. परिस्थितीचा अंदाज घेऊन जागतिक आरोग्य संघटनेने जगभर ईबोला अलर्ट जाहीर केला आहे. इबोला ही एक आंतरराष्ट्रीय आरोग्य आणीबाणी असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले.

जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रोस अधानोम गेब्रेयसस यांनी रविवार १७ मे २०२६ रोजी काँगो आणि युगांडामधील इबोलाचा प्रादुर्भाव 'जागतिक सार्वजनिक आरोग्य आणीबाणी' म्हणून घोषित केला. बुंदीबुग्यो विषाणूमुळे होणारा उद्रेक म्हणजे कोविड-१९ प्रमाणे जागतिक महामारी नाही. पण खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले. एवढ्यात कोणत्याही देशाने इतरांसाठी आपल्या आंतरराष्ट्रीय सीमा बंद करण्यासारखी परिस्थिती झालेली नाही. पण खबरदारी घेतली पाहिजे, असे जागतिक आरोग्य संघटनेकडून सांगण्यात आले.

# ICEYE भारतात उपग्रह उत्पादन सुरू करणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – अंतराळ-आधारित गुप्तचर क्षेत्रातील जगातील आघाडीची कंपनी 'आय-साय' पुढील एका वर्षात भारतात आपले पहिले उपग्रह उत्पादन केंद्र स्थापन करणार आहे. या केंद्रामध्ये देशाच्या सुरक्षेसाठी, पाळत ठेवण्यासाठी आणि पर्यावरण निरीक्षणासाठी आवश्यक असलेल्या लहान उपग्रहांची निर्मिती केली जाईल. 'आय-साय'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सह-संस्थापक राफल मॉड्रझेव्स्की यांनी ही माहिती दिली. हे केंद्र कंपनीचे आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील प्रमुख उत्पादन केंद्र म्हणून काम करेल आणि अमेरिका व युरोपमधील ऑपरेशन्सना पूरक ठरेल.


भारतातील गुंतवणुकीबाबत राफल मॉड्रझेव्स्की म्हणाले, भारताची सध्याची गरज आणि आमचे तंत्रज्ञान यामध्ये उत्तम ताळमेळ आहे. जागतिक स्तरावर सध्या दोन मोठे प्रवाह दिसत आहेत. वाढता संरक्षण खर्च आणि अंतराळ तंत्रज्ञानाचा वाढता वापर. भारतात हे (पान ६ वर...)

# ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार – मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, येत्या ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

पुणे ग्रीन हॅकेथॉनच्या पारितोषिक वितरण आणि समारोप समारंभानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी कर्जमाफीसह पार्थ पवार यांची भेट, कथित ऊर्जा संकट, ड्रग्जविरोधी मोहीम आणि मराठा समाजाच्या कल्याणकारी योजना अशा विविध राजकीय व सामाजिक मुद्द्यांवर आपली भूमिका मांडली.

शेतकरी कर्जमाफीबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या संदर्भात कॅबिनेट उपसमितीची महत्त्वाची बैठक पार पडली आहे. आम्ही प्रशासनाकडून काही अतिरिक्त आणि सविस्तर माहिती मागवली आहे. ती माहिती हाती येताच प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत ३० जूनपूर्वी राज्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ दिला जाईल.




# शिक्षण माफियांच्या मुसक्या आवळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही - अमित ठाकरे

**मुंबई (प्रतिनिधी)** – देशभरात प्रचंड खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणात आता दररोज अत्यंत धक्कादायक माहिती समोर येत आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या परीक्षा प्रक्रियेत थेट सहभागी असलेला रसायनशास्त्राचा माजी प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याला सीबीआयने अटक केल्यानंतर या घोटाळ्याची व्याप्ती किती मोठी आहे, हे स्पष्ट झाले आहे.



या प्रकरणात आतापर्यंत देशभरातून ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अशातच आता या प्रकरणावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) युवानेते अमित ठाकरे यांनी आक्रमक पाऊल उचलले असून त्यांची एक फेसबुक पोस्ट सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अमित ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या आत्महत्येला ही भ्रष्ट सिस्टीम जबाबदार असल्याचा थेट आरोप केला आहे.

अमित ठाकरे यांनी फेसबुकवर पोस्ट करत म्हटले आहे की, नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या भोंगळ आणि भ्रष्ट कारभारामुळे आज देशातील आणि महाराष्ट्रातील २२ लाख (पान ६ वर...)

# राष्ट्रवादीच्या गोटात हालचालींना वेग, पार्थ पवार अचानक देवेंद्र फडणवीसांच्या भेटीला

**मुंबई (प्रतिनिधी)** –गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस-मध्ये सुरु असलेल्या नाराजी नाट्याच्या पार्श्वभूमीवर शनिवारी रात्री आणखी एक नवीन घडामोड घडताना दिसली. राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार आणि सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी शनिवारी अचानक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. कोणालाही सुगावा लागू न देता पार्थ पवार हे शनिवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा बंगल्यावर पोहोचले. याठिकाणी दोन्ही नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत नेमकी काय चर्चा झाली आणि भेटीचे नेमके प्रयोजन, याचा तपशील अद्याप गुलदस्त्यात आहे.

सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सुरू असलेल्या अंतर्गत वादाच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी पक्ष संघटनेत कमालीचे सक्रिय झालेले पार्थ पवार हे काल एकटेच देवेंद्र फडणवीस यांना भेटायला गेले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांना पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतून वगळल्याची बाब समोर आल्यानंतर या सगळ्या नाराजीनाट्याला सुरुवात झाली होती. प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांचे नाव निवडणूक आयोगाला पाठवलेल्या कार्यकारिणीच्या यादीत नसणे, ही प्रिंटिंग मिस्टेक असल्याचे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेसकडून देण्यात आले होते. निवडणूक आयोगाला नव्या पदाधिकाऱ्यांच्या यादीबाबत पत्र लवकरच पाठवले जाईल, असेही राष्ट्रवादीकडून सांगण्यात आले आहे. मात्र, ही खरोखरच प्रिंटिंग मिस्टेक होती की सुनेत्रा पवार यांनी सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांना दिलेला अप्रत्यक्ष संदेश होता, याविषयी राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लढवले जात आहेत. पार्थ पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात काही नवीन घडामोडी घडणार का, हे बघावे लागेल. एकीकडे प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांना पक्षात साईडलाईन केल्याची चर्चा सुरु असताना सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी या सगळ्याबाबत चकार शब्द काढलेला नाही. तर दुसरीकडे आमदार रोहित पवार हे जवळपास दररोज प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर शाब्दिक हल्ले चढवत आहेत. अजित पवार यांनी शेवटच्या चार महिन्यांमध्ये माझ्याशी बोलताना अनेकदा प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती, असा दावा रोहित पवार यांनी केला होता.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# इंधन दरवाढ: महागाईचे दुष्टचक्र

देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात झालेली प्रतिलिटर तीन रुपयांची वाढ वरकरणी किरकोळ वाटू शकते; मात्र तिचे आर्थिक आणि राजकीय परिणाम दूरगामी होणार आहेत. आधीच महागाईच्या झळांनी त्रस्त असलेल्या सामान्य नागरिकांसाठी ही वाढ म्हणजे नव्या संकटाची चाहूल आहे. इंधनाचे दर वाढले की, त्याचा थेट परिणाम केवळ वाहनचालकांवर होत नाही, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. वाहतूक खर्च वाढतो, मालवाहतुकीचे दर चढतात, शेती उत्पादनांच्या किंमती वाढतात आणि अखेरीस सर्वसामान्य ग्राहकाच्या खिशावर अतिरिक्त भार पडतो. पश्चिम आशियातील वाढता संघर्ष, होर्मूज सामुद्रधुनीतील तणाव आणि जागतिक कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमती यामुळे भारतासारख्या आयात-आधारित देशावर दबाव निर्माण होणे स्वाभाविक आहे. भारत आपल्या गरजेपैकी जवळपास ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय घडामोडींचा परिणाम देशातील इंधनदरांवर तत्काळ दिसून येतो. सरकारने अनेक महिने इंधनदर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु तेल विपणन कंपन्यांचे वाढते तोटे अखेर लपवून ठेवणे अशक्य झाले. परिणामी ही दरवाढ अपरिहार्य ठरली. मात्र येथे मूलभूत प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे, इंधनदर खरोखर बाजाराच्या तत्त्वांनुसार ठरतात का? काही वर्षांपूर्वी सरकारने पेट्रोल-डिझेल दर नियंत्रणमुक्त केल्याचा दावा केला होता. त्या वेळी नागरिकांना सांगण्यात आले की, जागतिक बाजारातील बदलांनुसार दर आपोआप ठरतील आणि सरकारचा हस्तक्षेप राहणार नाही. प्रत्यक्षात मात्र परिस्थिती वेगळी दिसते. निवडणुकांच्या काळात किंवा राजकीयदृष्ट्या संवेदनशील वातावरणात इंधनदर स्थिर ठेवले जातात आणि नंतर टप्प्याटप्प्याने वाढवले जातात. त्यामुळे इंधनदरांचे अर्थकारणापेक्षा राजकारणाशी अधिक नाते असल्याचे स्पष्ट होते. सरकार एका बाजूला तेल कंपन्यांचे आर्थिक संतुलन राखण्याचा प्रयत्न करत आहे, तर दुसऱ्या बाजूला जनतेच्या नाराजीपासून दूर राहण्याची धडपड करत आहे. त्यामुळे ही वाढ पूर्ण बाजाराधारित नसून राजकीयदृष्ट्या नियंत्रित असल्याचे दिसते. तीन रुपयांची वाढ ही तेल कंपन्यांच्या सर्व तोट्यांची भरपाई करण्यास पुरेशी नाही. जर जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर आणखी वाढले, तर भविष्यात पुन्हा दरवाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या दरवाढीचा सर्वाधिक फटका मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना बसणार आहे. आधीच भाज्या, धान्य, दूध आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढलेल्या असताना इंधनदरवाढ महागाईला आणखी खतपाणी घालणार आहे. सार्वजनिक वाहतूक, खासगी प्रवास, मालवाहतूक आणि शेतीसाठी लागणारा डिझेल महाग झाल्याने ग्रामीण भागातही त्याचे परिणाम तीव्रतेने जाणवतील. शेती उत्पादनांचा खर्च वाढल्याने शेतकऱ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागेल. सरकारने केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर भर न देता दीर्घकालीन ऊर्जा धोरण आखण्याची गरज आहे. पर्यायी ऊर्जास्रोत, सार्वजनिक वाहतुकीचा विस्तार, इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन आणि इंधनावरील कररचनेचा पुनर्विचार यासारखे निर्णय आता टाळता येणार नाहीत. केंद्र आणि राज्य सरकारांच्या करांचा मोठा हिस्सा इंधनदरांमध्ये समाविष्ट असतो. त्यामुळे जागतिक बाजारातील घसरणीचा पूर्ण लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचत नाही, ही वस्तुस्थितीही दुर्लक्षित करून चालणार नाही. आज देशातील सामान्य नागरिकाला सर्वाधिक अपेक्षा आहे ती पारदर्शकतेची. इंधनदर वाढीमागील कारणे स्पष्टपणे सांगणे, कररचनेची माहिती खुली करणे आणि तेल कंपन्यांच्या तोट्यांचा प्रामाणिक आढावा जनतेसमोर मांडणे आवश्यक आहे. अन्यथा राजकीय किंमत निर्धारण हा आरोप अधिक बळकट होत राहील. इंधनदरवाढ हा केवळ आर्थिक विषय नाही; तो जनजीवनाशी निगडित सामाजिक प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने महसूल आणि राजकीय गणित यापलीकडे जाऊन सामान्य माणसाच्या जगण्याचा विचार करणे आज अत्यावश्यक बनले आहे.

# शरीर संपत्ती सर्वश्रेष्ठ धन

मानवी शरीर निसर्गाचा एक अद्‌भूत चमत्कार आहे. आपल्या जीवन प्रवासात शरीर आणि आपली इंद्रिये ही अत्यंत महत्वाची संपत्ती आहे. ज्या संपत्तीचे मूल्य कधीही पैशात मोजता येणार नाही.सर्व प्रगतीचा तो आरंभबिंदू आहे. या संपत्तीशिवाय होणारी प्रगती मनुष्याला निखळ सुखापर्यंत नेऊ शकत नाही. मनुष्य जीवनाचे अंतिम ध्येय हे निखळ आणि निरागस आनंदात दडलेले आहे.त्यामुळे सशक्त शरीर असेल तर अनेक दुःखावर मात करून सुखाच्या म ार्गाकडे वाटचाल करणे. आपल्या ध्येयाची दिशा ठरविणे आणि त्यासाठी अतोनात कष्ट उपसण्याची तयारी ठेवणे शक्य आहे. केवळ इच्छाशक्ती आहे, पण शरीर साथ देत नाही त्या व्यक्तीला त्याच्या आंतरिक इच्छेला लगाम घालावा लागतो.

शरीर संपत्ती मिळविण्यात अपयशी ठरलेले युवक उसळते साहस घेऊन जगण्याच्या ऐन उमेदीत आपल्या आजारांचे कौतुक करीत फिरताना दिसतात. कोणत्याही कार्यकर्तृत्वाचा आनंद घेण्यासाठी असमर्थ ठरलेल्या युवकांना आपले जीवन भकास वाटू लागते. त्यामुळे शरीर ही संपत्ती आहे, ते एक नादमधुर संगीत आहे, तो जीवनातील सर्वोच्च आनंद आहे, नव्हे तो स्वर्ग आहे. शरीराची महती स्पष्ट करताना खूप ज्येष्ठ व श्रेष्ठ विचारवंतांनी हे अनेकदा आपल्यासारख्या पामरांना सांगितले आहे. पण जेव्हा तरुणाईचे उसळते साहस रोमारोमांत संचार करते. तेंव्हा या शरीरधनाची जोपासना करणे, त्यामधून दीर्घायुरोग्य प्राप्त करुन घेणे आणि जीवनप्रवासातील दीर्घायुष्याचा परमोच्च आनंद घेणे या गोष्टीचा आम्हाला विसर पडतो. हे अगदी सहजसाध्य झाले आहे. यासाठी कोणतेही कष्ट घ्यावे लागले नाही. त्यामुळे जीवनातील व्यसनाधीनता, अविचार, वाममार्ग याचे आम्ही एवढ्या सहजपणे समर्थन करतो. त्या समर्थनामुळे भावी जीवनात निर्माण होणाऱ्या संकटाची तमा बाळगण्याची गरज युवकांना वाटली पाहिजे. उसळत्या साहसात विचारी बीजे रुजलेली असतील तर ती शक्ती सकारात्मक कार्याच्या दिशेने वाटचाल करेल. दिशाहीन उसळते साहस वाममार्गाच्या दिशेने वाटचाल करीत असेल तर ते शरीरधन युवाशक्तीच्या नाशाला कारणीभूत ठरते. युवाशक्तीकडे अत्यंत आशेने पाहणाऱ्या पालकांचा आधार जो युवक होऊ शकत नाही. ते शरीर-धन काय उपयोगाचे? आपल्या शक्ती दिशाहीन होणार नाही हा विचार घेऊनच युवकांची दिनचर्या असली पाहिजे.



मानवी शरीर निसर्गाची अनमोल देणगी आहे. त्याचा उपयोग अविचाराने केल्यामुळे ज्यावेळी शरीर असंख्य व्याधींनी ग्रस्त होते तेंव्हा निर्माण होणारी सद्‌बुद्धी, हे वेळ निघून गेल्या नंतरचे शहाणपण आहे. आपल्या शहाणपणाचा उपयोग योग्य वेळीच करता आला पाहिजे. देहमंदिरावर आजाररूपी राक्षसी हल्ले होऊ लागल्यावर आम्ही जागे होतो. त्यानंतर वैद्यकीय इलाज करणे सुरू होते. पण एकदा का आजाररूपी हल्ले सुरू झाल्यावर बचाव-ात्मक पवित्रा घेऊन करण्यात येणारे इलाज किती परिणामकारक ठरतील याची शाश्वती देता येत नाही. मनाचे आणि विचारांचे सामर्थ्य कोणत्याही औषधापेक्षा श्रेष्ठ असते. तेंव्हा त्या सामर्थ्याचा विचार आम्हाला केंव्हाच पडता कामा नये.

आपल्या आरोग्यावरच आपले मन, बुद्धी, भावना ह्यांची अवस्था अवलंबून असते. मनाविषयी विचार करताना अंतर्मन व बहिर्मन अशा दोन्ही अवस्-थेचा विचार प्रामुख्याने आपल्याला करावा लागेल. दोन्ही मनात सुरू असलेले द्वंद्व हे बरेच वेळा न संपणारे असते. याचे महत्वाचे कारण अंतर्मनात सुरू असणाऱ्या आंतरक्रिया बहिर्मनाशी जुळत नाहीत. सारांश आत चालले काय, आणि बाहेर दाखवतो काय? अशी अवस्था प्रामुख्याने बऱ्याच युवकांची आपल्याला दिसते.

दिसणे आणि असणे हे जर प्रामुख्याने वेगवेगळे असेल तर आपली नेहमीच फसगत होत राहते. हे दिसणे व असणे इतरांची फसवणूक करण्याच्या संदर्भात नसेल तर एक वेळ ते फारसे घातक ठरणार नाही, पण पुढे असा प्रश्न निर्माण होतो की आपण स्वप्रतारणा का करावी? मुक्त, स्वच्छंदी अगदी निर्मळ झऱ्यासारखं का जगता येऊ नये? बहुतांशी अतिसंकोची, अव्यक्त स्वभावाचे युवक मोठ्या प्रमाणात स्वप्रतारणा करून घेतात. त्याचे महाभयंकर दुष्परिणाम ते भोगत असतात.

असणे आणि भासवणे ही एक प्रचंड कला आहे, असे समजणारे अनेक महाभाग असतात. त्यामुळे अगदी सहजपणे बनवाबनवी करण्यात आपण यशस्वी होतो. हा दृढ विश्वास असणारे युवक आपल्या जीवनातील विश्वासाहर्ता तर गमावतातच, पण त्यांच्या अंतर्मनात व बहिर्मनात नेहमीच सुरू असणारे महायुद्ध यांच्या मनोविश्वाचा विध्वंस करीत असते. काही कालावधीची 'अशी ही बनवाबनवी' नेमकी आपल्याला अगदी कडेलोटाच्या शिखरावर कशी घेऊन गेली? त्यानंतर ती आपल्या भवितव्याची 'कशी ही बनवाबनवी' झाली. हे या महान कलाकाराला कळत नाही. जेंव्हा कळते, तेंव्हा त्या कळण्याचा काहीच उपयोग नसतो, कारण चुकीच्या मनो व्यापारामुळे त्याने माणूस म्हणून जगण्याचा अधिकार केंव्हाच गमावलेला असतो.

युवावस्थेत ही बाब खूप लक्षात घेण्यासारखी आहे, आपण माणूस म्हणून जगण्याचा अधिकार केंव्हाच गमविता कामा नये. आपल्या बुद्धीचा होणारा विकास आपल्याला स्वार्थाकडे, कुसंगतीकडे किंवा वामर्गाकडे नेऊ शकतो, पण आपल्या मनाचा आणि भावनेचा विकास आपल्याला केंव्हाच वाईट दिशेने नेऊ शकत नाही. मन, भावना आपल्याला मानवी शरीरातील यंत्र बनू देत नाहीत.आपल्या अगोदर इतर व्यक्तीच्या सुख-दुःखाचा विचार करायला लावते ते मानवी मन. ते आपल्याला या पर्यावरणातील प्रत्येक जीवसृष्टीचा विचार करायला लावते. पशु, पक्षी, प्राणी, वृक्ष, वल्ली या चराचरांत ते आपल्याला आत्मा आणि परमात्माचा विचार करायाला लावते. जेंव्हा बाल्यावस्थेपासून मानवी जीव हा विचार करायला लागतो. तेंव्हा त्याला वेगळ्या ईश्वरभक्तीची गरज नाही. तो प्रत्येक जीवाशिवातील ईश्वरापर्यंत पोहचतो. तो जीवसृष्टीत एकरूप होतो. तो मानवी जीवनाचा खरा आनंद घेतो. इहलोकीचा मोक्ष तोच पाहतो आणि क्षणोक्षणी ईश्वरभक्तीचा आनंद तोच घेतो.

ईश्वर आपले मनोरथ तेंव्हाच पूर्ण करेल जर तुमचा प्रयत्नवादावर पूर्ण विश्वास असेल. माउलीने पसायदानात उल्लेख केला. जो जे वांच्छील तो ते लाहो प्राणिजात, पण याचा अर्थ समजून घेतांना केवळ भक्तीने ते प्राप्त होऊ शकणार नाही. त्याला तुमची अपार मेहनत, शक्ती, बुद्धी, नियोजन सर्वच गोष्टीची जोड हवी.

ईश्वरभक्ती यासाठी आवश्यक आहे. मला सद्‌विचाराचा व सत्कार्याचा विसर पडू नये. माझ्या मनात राग, द्वेष, कुवासना, लालसा निर्माण होऊ नये. इतरांचे सुख, आनंद पाहून माझ्या मनात द्वेष निर्माण होऊ नये. मला माणूस म्हणून आनंदात जगता यावं. प्रत्येक प्रसंगी माझ्या मनात सकारात्मक विचारांचा वास असावा. ईश्वरभक्ती, नामस्मरण यासाठी आहे. ईश्वरभक्तीचे केवळ नाटक करून सर्वसामान्यांची फसवणूक करणारे काही थोडे नाहीत. मनुष्य वर्तनासंबंधी विचार केला असता 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असणारच. मनुष्यवर्तनासंबंधी निश्चित निष्कर्ष काढणे खूप कठीण आहे. मनुष्यजीवन असंख्य अनिश्चीततेने, संघर्षाने व थोडक्यात युद्धाने भरलेले आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात,

रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग।। अंतर्बाह्य जग आणि मन।। ज्याचा मन आणि भावनांवर ताबा तो जग जिंकू शकतो. त्याला अशक्य असे काही नाही. मन आणि भावना ताब्यात ठेवण्यासाठी आमच्या विचारांची व्यापकता वाढवून मनोनिग्रह करणे आवश्यक आहे. आमच्या युवाशक्तीला विचारांची व मनोनिग्रहाची जोड मिळो व ही शक्ती राष्ट्र कार्याच्या सत्कारणी लागो. हीच सर्व ज्येष्ठांची मनोकामना. या देशातील समस्त युवकांना राष्ट्रभक्तीचे महत्व कळेल, तेंव्हा आमच्या देशाचे भविष्य उज्वल असेल, हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्याची गरज असणार नाही.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# सरोज एन. पाटील (माईसाहेब) : ग्रामीण शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्तेची क्रांतिकारी दीपस्तंभ



महात्मा फुलेंनी तत्कालीन व्यवस्थेविरुद्ध अविद्येच्या घाताचा म्हणजेच, ज्ञानार्जन करण्याचा मूलमंत्र दिला होता. त्याच विचारांची आधुनिक पुनर्रचना करत माईसाहेब सरोज पाटील यांनी आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (I) या माध्यमातून ग्रामीण शिक्षणात क्रांती घडवण्याचा ध्यास घेतला आहे.

पत्रकारिता आणि शिक्षण क्षेत्रात येण्यापूर्वी माझी जी वैचारिक जडणघडण झाली, त्यामध्ये दिवंगत आमदार रायभान जाधव आणि एमजीएम विद्यापीठाचे अध्यक्ष तथा माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांचे मोठे योगदान आहे. सत्यशोधक सम ाजाच्या विचारप्रवाहातून मला महाराष्ट्रातील अनेक विचारवंतांच्या सहवासाची संधी मिळाली. प्राचार्य पी. बी. पाटील आणि प्रा. एन. डी. पाटील यांचे विचार माझ्या मनावर कोरले गेले.

प्रा. एन. डी. पाटील हे कष्टकरी आणि शेतकऱ्यांचे खरे कैवारी होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य कष्टकरी आणि शेतकऱ्यांसाठी समर्पित केले. त्यांचे अभ्यासू व्यक्तिमत्त्व आणि लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची तळमळ आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांच्या अनुषंगाने मी ही संघर्षाची वाट निवडली.

२०२१ साली कोल्हापूर येथे त्यांच्या भेटीदरम्यान, आजारपणातही त्यांनी माझे पुस्तक चाळून पाहिले आणि मला आशीर्वाद दिला तो क्षण माझ्यासाठी अत्यंत अमूल्य ठरला. त्या वेळी त्यांच्या सुविद्य पत्नी, आदरणीय माईसाहेब सरोज पाटील यांची ओळख अधिक जवळून झाली. त्यांचा साधेपणा, आदरातिथ्य आणि विचारांची खोली मनाला भिडणारी होती.

माईसाहेबांची संघर्षगाथा ही केवळ एन. डी. पाटील यांच्या सहचारिणी म्हणून नाही, तर स्वतःच्या बळावर उभी राहिलेली एक प्रेरणादायी वाटचाल आहे. माईसाहेबांच्या जीवनातील ध्येय, मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी यांचा प्रत्यय मला अनेक भेटींमधून आला.

रामनवमीच्या दिवशी त्यांच्या घरी राहण्याचा योग आला. एका अनोळखी व्यक्तीलाही कुटुंबातील सदस्याप्रमाणे सामावून घेणारी त्यांची वृत्ती विलक्षण आहे. वयाच्या ८७ व्या वर्षीही त्यांची ऊर्जा, स्पष्टवक्तेपणा आणि कार्यतत्परता आश्चर्यचकित करणारी आहे. मी त्यांची येणाऱ्या मुलाखतीच्या विनंतीला उत्तर देताना त्यांनी सांगितले, संजय, मला ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता पोहोचवायची आहे. माझा एक प्रकल्प सुरू आहे; तो पूर्ण होईपर्यंत मला वेळ नाही. हीच त्यांची ध्येयनिष्ठा!

११ मे २०२६ रोजी ढवळी येथे त्यांनी सुमारे ५० लाख रुपये खर्च करून अत्याधुनिक I लॅब उभारली. पद्मश्री डॉ. प्रतापराव पवार यांच्या हस्ते तिचे उद्‌घाटन झाले. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले. हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी होता. ही घटना केवळ एका लॅबची स्थापना नसून ग्रामीण शिक्षणात तंत्रज्ञानाची नवी क्रांती आहे. जसे कर्मवीरांनी शिक्षणाची ज्योत पेटवली, तसेच माईसाहेबांनी आधुनिक काळात I च्या माध्यमातून नवा मार्ग दाखवला आहे. त्यांच्या दिवंगत नातवाच्या स्मृतीत उभारलेले हे शैक्षणिक संकुल (राष्ट्रीय जलतरणपटू सागर पाटील विद्यालय, ढवळी, जिल्हा सांगली.) हे दुःखातून उभ्या राहिलेल्या सृजनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. वैयक्तिक वेदना बाजूला ठेवून समाजासाठी कार्य करणारे व्यक्तिमत्त्व विरळच असते. आज माईसाहेब केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर लक्ष वेधून घेणारे व्यक्तिमत्त्व ठरत आहेत. त्या खऱ्या अर्थाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाची आई आहेत.

धन्य त्या माईसाहेब आणि धन्य ते एन. डी. पाटील! सलाम माईसाहेब, सलाम!

**-संजय टाकळगव्हाणकर,**
हिंगोली.

# 'व्हाट्सॲप' स्टेट्स का ठेवायचे?

पूर्वी किंवा आताही 'वाचकांचा पत्रव्यवहार' हे सदर वर्तमानपत्रात असायचे. 'सुबह सवेरे' हा कार्यक्रम आम्ही लहान असताना सकाळीच दूरदर्शनला यायचा, ज्यात वाचक पत्रव्यवहार करायचे. आता फरक इतकाच झाला की, दैनिकातला एखादा लेख वाचला की वाचक त्या संबंधित लेखकाला थेट फोन करून त्यांचा त्या लेखाविषयीचा त्यांचा दृष्टीकोन कळवतात. मग कोणाला लिखाण पटते तर कोणाला नाही. मुळात लेखकाचे लिखाण हे समाज प्रबोधनासाठीच असते. कोणात मतभेद व्हावेत किंवा दुही पसरावी असे लिखाण नसते, तसे असेल तर कुठलाही संपादक ते तो स्वीकारत नाही; पब्लिश करत नाही. असो. माझे वाचकही मला फोन करतात आणि त्यांना लेख आवडला हे कळवून पुढे लिहिण्यासाठी शुभेच्छा देतात. काहीजण त्यांच्या फर्माईशपण सांगतात. मला वाटले तर त्या विषयावरती मी लिहितो. जसे की 'व्हाट्सॲप स्टेट्स' विषयी.

तुमचे व्हाट्सॲप रोज खोलता, आणि त्यात स्टेट्स नावाचे निरुपयोगी सदरही रोज पाहता. अर्थात ते काढण्यामागचा व्हाट्सॲपचा उद्देश ते लोकांना उपयोगी पडावे असाच होता. पण सध्या झाले असे की, त्या स्टेट्सच्या ढिगाऱ्यामुळे लोकांना ते म्युट करायची वेळ ही या लोकांमुळेच आली. कोणी ते न आवडत्या लोकांचे म्युट करतात तर कोणी सगळ्यांचेच. मुळात व्हाट्सॲपवरील स्टेट्स म्हणजे काय? ते आधी समजून घेऊया.

लोक एकमेकांना संवाद साधण्यासाठी एकमेकांना बोलतात. दूरवरच्या आप्तेष्टांना बोलायचे असेल तर पूर्वी पत्रव्यवहार करायचे; त्यांनंतर दूरध्वनी आले, नन्तर मोबाईल फोन्स. मोबाईल फोन्समुळे त्या विवक्षित व्यक्तीपर्यंत सहज पोहचता येऊ लागले. जे पत्रव्यवहारात सहज पोहचता यायचे नाही. आपला संदेश तर त्यातही लोकांपर्यंत जायचा, पण थोड्या उशिराने. मोबाईल फोन्सचा तोटा असा झाला की त्यात विनाकारण येणारे कॉल्स वाढले. ज्यात निरुपयोगी लोकांना काम लागले; आणि त्यात कामातील लोकांचा वेळ विनाकारण वाया जात होता. त्यामुळे व्हॉइस कॉलबरोबर मेसेजिंगची सुविधा मोबाईल कंपन्यांनी दिली. ज्यात एखादा व्यक्ती कामात असेल तर त्याला डिस्टर्ब न करता तुम्ही तुमचा मेसेज त्या मेसेजिंगद्वारे त्या संबंधित व्यक्तीपर्यंत पोहचवू शकत होते. जे प्रत्येक मोबाईल कंपनी आजही ती सुविधा पुरवते. पण आता मेसेजिंग ॲप आल्यावर ते थोडे मागे पडले. त्यातला मेसेजिंग ॲपचा प्रचलित व प्रसिद्ध नमुना म्हणजे 'व्हाट्सॲप' होय. त्यात मेसेज करणे इतके सोपे झाले की, ते सहज असल्यामुळे सहजरित्या तुम्ही कोणालाही मेसेज करू शकत होतात. आता टेक्नॉलॉजी



एवढी फास्ट व स्मार्ट आहे की, ती एका जागी कधी थांबत नाही. बल्क मेसेजिंग हा प्रकार तुम्ही ऐकला असेल ज्यात एकावेळी अनेकांना मेसेज एकगठ्ठा पाठवायचा असतो. ज्यात व्हाट्सॲपने दोन सोयी दिलेल्या आहेत. 'व्हाट्सॲप ग्रुप आणि ब्रॉडकास्ट ग्रुप'. दोन्हीमध्येपण एकाचवेळी अनेक लोकांना मेसेज करता येतो. ग्रुपमध्ये विनाकारण एकाला सांगायचे तर अनेकांपर्यंत मेसेज जातो. आता लोकं इतक्यात 'वेळेअभावी पत्रिका देऊ शकलो नाही, तर हेच निमंत्रण समजून लग्नाला या.' अशा मथळ्याचा मेसेज व्हाट्सॲपवर बऱ्याच ग्रुपवरती करतात. याचा अर्थ ग्रुपवरील सर्व मेम्बर्सने त्या कार्यक्रमाला हजेरी लावायची का? अर्थात तुम्हाला लावायची असली तरीही बोलवणाऱ्या व्यक्तीची तशी इच्छा आहे का? तुमची अन् त्यांची ओळखच नाही तर कसे जाणार तुम्ही तिथे? मग समस्यांवर एक उपाय आला; तो म्हणजे ब्रॉडकास्ट ग्रुपचा! जो आपला वैयक्तिक ग्रुप असतो. त्यात एक मेसेज करून अनेकांना पाठवता येतो आणि तो प्रत्येकापर्यंत वैयक्तिक पोहचतो. ज्यात लोकही आपण निवडलेले, आपल्या ओळखीचे असतात. आता प्रश्न हा पडतो की, मग 'व्हाट्सॲप स्टेटस'चे काम काय? अर्थात त्याचेही महत्त्वाचे काम आहे. ब्रॉडकास्ट ग्रुपवर जसे आपण एखादा मेसेज आपल्याला पाहिजे त्या व्यक्तीपर्यंत पो-हचवता येतो तसे यात आपला मेसेज आपल्या कॉन्टॅक्टमधील सर्व व्यक्तीपर्यंत पोहचवता येतो. अट एवढीच की, आपला कॉन्टॅक्ट त्यांच्याकडे सेव्ह पाहिजे, म्हणजे तुम्ही त्यांच्या संपर्कात हवेत. ग्रुपमधील मेसेजचा आणि स्टेट्सवरील मेसेजचा फरक इतकाच की, तुम्ही यात विनाकारण ज्यांना गरज नाही त्यांना मेसेज पाठवून त्यांचा मोबाईल हँग करत नाही. स्वतःच्या स्टेट्सला तो मेसेज ठेवता. ज्यांना गरज असेल ते पाहतात, गरज नसणारे दुर्लक्ष करतात. हाच मेसेज जर तुम्ही व्हाट्सॲप ग्रुपवर शेअर केला तर त्यामुळे आवश्यक मेसेज पण दुर्लक्षित होऊ शकतात, म्हणून ग्रुपवर कोणी आपला वैयक्तिक मेसेज शेअर करत नाही.

व्हाट्सॲप स्टेटसवर कुठला मेसेज ठेवायचा असतो याची एक रूपरेषा असते. लोकांना एव्हाना ती कळलीच नाही. इथले स्टेट्स म्हणजे आज तुम्ही काय करत आहात? आज तुम्ही कुठे आह-ात? लोकांना तुम्ही आज उपलब्ध आहेत की नाही? ते सहज तुमच्या त्या स्टेट्सवरील मेसेजने तुमच्या स्वकीयांना कळते. 'स्वकीय' हा शब्द मी मुद्दाम वापरला कारण यात मेसेज व्हाट्सॲप ग्रुपसारखा अनोळखी व्यक्तींना द्यायचा नसतो. थोडक्यात त्या मेसेजचे रूप सांगतो. 'आज मी नांदेडला आहे.' म्हणजे तुमच्या ऑफिस व तुमच्या स्वतःच्या गावाकडे तुम्हाला कोणी शोधत बसणार नाही; कारण तसे तुम्ही सर्वांना कळवले आहे. अनोळखी व्यक्तींना तुमचे काम पडले तर ओळखीचे व्यक्ती त्यांना कळवतीलच की. 'आज मी १२ ते २ मिटिंगमध्ये आहे.' म्हणजे तुम्हाला कोणी त्या वेळेत डिस्टर्ब करणार नाही. कधी तुमच्या घरातील वाढदिवस, लग्नसमारंभाचे फोटो असतील ते तुम्ही स्टेट्सला ठेवू शकता. अर्थात तो स्टेट्सचा भाग नाही. पण एक चांगला उपयोग म्हणून कोणालाही डिस्टर्ब न करता तुम्ही लोकांपर्यंत पोचवू शकता आणि वाढदिवस व लग्नसमारंभ काय रोज आपल्या घरी घडत नसतात. पण त्यातही कोणाला वाढदिवस शुभेच्छा देणे, कोणाला अनिवर्सरीच्या शुभेच्छा त्या स्टेट्सवर ठेवून देणे गरजेचे नाही. तुम्ही वैयक्तिक त्यांना द्या की शुभेच्छा. उगाच ईश्वराचा अवतार जन्मल्याप्रमाणे सर्वांपुढे कशाला ढिंढोरा पिटता. त्यांची खुशामत करायची तर एखादे मोठे गिफ्ट द्या. हा फुकटचा मोठेपणा काय कामाचा. स्टेट्सला 'निधन वार्ता' तुम्ही कळवू शकता. जे-जे महत्वाचे आहे आणि ते आपल्या स्वकीयांपर्यंत पोहचवावे वाटते ते ते तुम्ही स्टेटसला ठेवू शकता. स्टेट्सचा बेसिक उद्देश हाच असतो की 'तुम्ही आज काय करताय' हे लोकांना कळवणे. म्हणजे ते तुम्हाला डिस्टर्ब न करता तुमच्या सवडीने बोलतील.

ज्या लोकांना हे स्टेट्स नाही समजले, त्यांनी तर याचा पूर्ण चुरडाचा करून टाकला. १९९० च्या गाण्याचे व्हीडीओ ठेवतात, आपले जुने फोटो काढून लटकवतात, रोज तेच तेच पांचट विनोद ठेवतात, याचा लोकांना त्रास होतो. त्यामुळे हे व्हाट्सॲप स्टेटस म्युट करण्याची वेळ लोकांवरती आली. काही महाभाग तर निव्वळ टोमणे मारायला या स्टेट्सचा उपयोग घेतात. जसे, 'आम्ही आशा लोकांना बोलत नाही, ज्यांचे आमच्याशी जुळत नाही.' आता तुमच्या या एका स्टेटसपायी किती लोकांच्या डोक्याला विनाकारण खुराक लावला तुम्ही. आता प्रत्येकजण याचा विचार करायला लागतो की माझे याच्यासोबत भांडण कधी झाले होते. आणि साधारण भांडण किंवा वाद असेल तर तो व्यक्ती विनाकारण अबोला तुमच्या त्या स्टेटसमुळे धरायला लागतो. मुळात लोकं हवे तसे टोमणे मारतात, ज्यांच्यापर्यंत मेसेज जायचा त्यापर्यंत तर जातोच, आणि नको त्यापर्यंतही. म्हणजे हवे त्याला काहीही बोला पण माझ्याविषयी का लिहलं म्हणून तुम्हाला कोणी जाब विचारणार नाही. पण वर्तमानपत्रात काही लिहले की अजाणते, नासमज लोकही निघतात जाब विचारायला, विरोध करायला. मग त्यांचा संबंध असो की नसो. याचा अर्थ काय होतो, लोकांना अपमान सहन होत नाही असा नाही, फक्त तो वैयक्तिक स्तरावर असावा तो सामूहिक नको. तसेच जोपर्यंत कोणाचे वैयक्तिक नाव घेऊन लिहले जात नाही तोपर्यंत कोणीही आपल्या मनाला लावून घायचे नाही. आता जर कोणी मनाला लावून त्याचा बाऊच करायचे ठरवलेच असेल तर गँगरीन होऊ द्या की त्याचा इलाज नाही.

माझ्या सांगण्याचा उद्देश हाच होता की व्हाट्सअप्प स्टेटस ठेवा; पण तो काढण्यामागचा उद्देश काय होता हे ध्यानात ठेवून ठेवा. तुमच्या टाइमपासपायी लोकांचा अमूल्य वेळ वाया घालवू नका. कारण त्या म्युटमुळे अनावश्यकसोबत आवश्यक मेसेजजी दृष्टिबाहेर जातात.

समज जितकी तितकेच बोलावे
काही येत नसेल
तर गप्प बसावे
उगाच दिले तोंड व हात म्हणून
का पसरताय?
तुमच्या वाचाळपणाने
समजही गैरसमज
व्हायले.!!

**-अमोल भारती,**
नांदेड
मो. ८८०६७२१२०६

# हदगाव तालुक्याच्या ८ गावांतील सर्व प्रकरणे आता अर्धापूर न्यायालयाकडे वर्ग

## प्रलंबित खटल्यांसह सर्व दिवाणी प्रकरणे वर्ग




**अर्धापूर (प्रतिनिधी) –** हदगाव तालुक्यातील ८ गावांच्या दिवाणी प्रकरणांबाबत राज्यशासन व जिल्हा न्यायालयाने निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र दिवाणी संहिता अधिनियमाच्या कलम २२ ए नुसार या गावांना आता हदगाव न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रातून वगळून अर्धापूर येथील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ विभाग) न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात समाविष्ट करण्यात आले आहे. हा आदेश १ मे २०२६ पासून लागू झाला आहे. त्यामुळे पक्षकार आणि नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

चाभरा, चोरंबा (ना.), निमगाव, खैरगाव, सोनाळा, चाभरा तांडा, रोडगी, निळकंठवाडी या आठ गावांतील चालू व नवीन खटले अर्धापूर न्यायालयात चालणार. नांदेडचे प्रधान जिल्हा न्यायाधीश नरेंद्र के. ब्रह्मे आणि रजिस्ट्रार यांच्या स्वाक्षरीने जारी झालेल्या आदेशानुसार या गावांचे सध्या हदगाव न्यायालयात प्रलंबित असलेली सर्व मूळ दिवाणी दावे आणि चालू कामकाज अधिकृतपणे मागे घेऊन ते अर्धापूर न्यायालयात वर्ग करण्यात येत आहेत. तसेच १८ मेपासून उद्‌भवणारे सर्व नवीन दिवाणी दावे देखील अर्धापूर न्यायालयातच नोंदवून घेतले जातील, अशी माहिती अधिवक्ता संघाचे तालुकाध्यक्ष तथा भाजपा जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. किशोर देशमुख यांनी दिली. यावेळी विठ्ठल काकडे आदींची उपस्थिती होती.

**पक्षकारांचा वेळ आणि पैसा वाचणार...**

भौगोलिक अंतर आणि प्रवासाचा त्रास विचारात घेता या ८ गावांचा अर्धापूर तालुक्याशी व न्यायालयाशी संपर्क येणे अधिक सोयीचे ठरणार आहे. न्यायालयीन कामकाजासाठी आता हदगावला जाण्याची गरज नसल्याने पक्षकार नागरिक आणि वकिलांची मोठी सोय झाली असून, परिसरातून या निर्णयाचे स्वागत होत आहे. हा आदेश जिल्हा न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर व सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

# सिडको परिसरातील शंकरराव चव्हाण अभ्यासिकेस आ. बोंढारकर यांची भेट



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –**नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील सिडको-हडको भागातील महानगरपालिका व शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे यांच्या पुढाकारातून साकारलेल्या शंकरराव चव्हाण अभ्यासिका, वाचनालय व उद्यानास नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी भेट दिली.

यावेळी अभ्यासिकेमार्फत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सोयी-सुविधांची आ. बोंढारकरांनी पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार व उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत अभ्यासिका कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यानंतर परिसरातील उद्यानांचीही पाहणी केली असून, नागरिकांसाठी ही उद्याने अधिक सुंदर, सुसज्ज व दर्जेदार करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

यावेळी माजी शहरप्रमुख साहेबराव मामीलवाड, पप्पू गायकवाड, रवी थोरात, रवी रायभोळे, कपील नरवाडे यांच्यासह अभ्यासिकेतील उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# जय हनुमान मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेत फसवणूक झालेल्या प्लॉटधारकांची सुनावणी

## मुद्रांक जिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी काढल्या नोटीसा

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील बळीरामपूर/धनेगावमध्ये सर्वे नं. १२१ मधील प्लॉटवर चुकीच्या पद्धतीने शासनाची व खरेदी करणाऱ्या प्लॉटधारकांची फसवणूक करून सोसायटी रद्द झाल्यानंतरही रजिस्ट्री करून देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध लवकरच फौजदारी कारवाईचा बडगा उगारण्यात येणार असून, त्यापूर्वी फसवणूक झालेल्या सर्व प्लॉटधारकांना मुद्रांक जिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी नोटिसा दिल्या आहेत. या प्रकरणात सुनावणी झाल्यानंतर दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल, असा विश्वास तक्रारकर्त्या प्लॉटधारकांनी व्यक्त केला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांना संबंधित तक्रारकर्त्यांनी तक्रार दिली होती, गैरअर्जदार हे संस्थेचे चेअरमन नसताना कन्व्हेन्स डिड केली. जय हनुमान मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था म. बळीरामपूर /धनेगाव या संस्थेची नोंदणी सन २०१७ मध्ये रद्द झालेली असताना त्यांनी गैरअर्जदार १ ते ३ यांनी व साक्षीदार दोघे यांनी कन्व्हेन्स डिड केलेली चुकीची व बोगस चेअरमन बनून माझ्या प्लॉटची दुसऱ्यांदा कन्व्हेन्स डिड करणाऱ्यांविरुद्ध तक्रारकर्त्याची फसवणूक केल्यामुळे फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.

या संदर्भात नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडून पृष्ठांकित केलेला तक्रारकर्ता यांचाही तक्रार अर्ज १३ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त झाला होता. संबंधित संदर्भिय पत्रान्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडून पृष्ठांकित केलेला तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असून, या अर्जाचे अवलोकन केले असता अर्जात नमूद केल्याप्रमाणे दस्त क्रमांकाच्या अनुषंगाने बळीरामपूर/धनेगाव ता. जि. नांदेड सर्वे नं. १२१ मधील प्लॉटची पोलीस अधीक्षक यांना तक्रार दिली होती की, गैरअर्जदार हे संस्थेचे चेअरमन नसताना कन्व्हेन्स डिड केली. जय हनुमान मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था म. बळीरामपूर/धनेगाव या संस्थेची नोंदणी सन २०१७ मध्ये रद्द झालेली असताना गैरअर्जदार १ ते ३ यांनी व साक्षीदार दोघे यांनी कन्व्हेन्स डिड केलेली चुकीची व बोगस चेअरमन बनून माझ्या प्लॉटची दुसऱ्यांदा कन्व्हेन्स डिड करणारावर माझी फसवणूक केल्यामुळे गैरअर्जदार यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत या कार्यालयाकडे विनंती केली होती.

त्याअनुषंगाने या प्रकरणात तक्रार अर्जात नमूद मुद्द्यांच्या अनुषंगाने चौकशी कामी आपण दि. २८ मे २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता आपलेकडील मूळ कागदपत्रासह/सक्षम पुराव्यानिशी सुनावणीसाठी कार्यालयात उपस्थित राहावे. आपण उक्त तारखेस गैरहजर राहिल्यास सदर प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे मुद्रांक जिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी कळविले आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा व व्याख्यानाचे आयोजन

**कुंडलवाडी (प्रतिनिधी) –**येथील छावा मराठा संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त दि.२० मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता शहरातील के.रामलू मंगल कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा व स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज काल, आज आणि उद्या या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी नुकत्याच इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा आणि पत्रकारांचा सन्मान छावा मराठा संघटनेच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती छावा संघटनेचे शहराध्यक्ष प्रा. डॉ. माधव हळदेकर यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार तर प्रमुख वक्ता म्हणून व्याख्यात्या डॉ. भारती मढवई, आणि प्रमुख मान्यवर म्हणून छावाचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर, संघटक प्राचार्य डॉ. कमलाकर कनसे, प्रवक्ते डॉ. प्रभाकर जाधव, जिल्हाध्यक्ष इंजि. प्रवीण जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून उपनगराध्यक्षा सौ. नेहा ऱ्याकावार, सोसायटी चेअरमन सुनिल बेजगमवार, सोसायटी चेअरमन साईनाथ उत्तरवार, माजी उपनगराध्यक्ष डॉ. विठ्ठलराव कुडमुलवार, उपाध्यक्ष हु.गो.पा.शि.प्र.मं.अर्जापूरचे राजेश्वरराव उत्तरवार, उपाध्यक्ष दक्षिण भाजपा व्यापारी आघाडी नांदेडचे दिनेश दाचावार, धर्माबादचे उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील, सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे आणि सर्व नगरसेवक, नगरसेविका यांची उपस्थिती राहणार असून या जन्मोत्सव सोहळ्यास आणि व्याख्यानास बिलोली, धर्माबाद तसेच कुंडलवाडी शहर व पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शहराध्यक्ष प्रा. डॉ. माधव हळदेकर यांनी एका प्रसिद्धीपत्रकानुसार केले आहे.

# श्री कालेजी देवी मंदिराचा कलशारोहण सोहळा उत्साहात



**मुदखेड (प्रतिनिधी) –** शहरातील श्री कालेजी देवी मंदिराचा कलशारोहण सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यानिमित्त गुरुवार, दि. ७ ते १४ मे या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. कलशारोहण विधी १४ मे रोजी हप्पी (कर्नाटक) पिठाचे शंकराचार्य जगद्गुरू श्री श्री श्री विद्यारण्य भारती यांच्या हस्ते श्री कालेजी देवी, भवानी देवी मंदिर, महादेव मंदिर या तीन मंदिराच्या शिखरांचा कलशारोहण धार्मिक विधी होमहवनासह संपन्न झाला.

यानिमित्त शंकराचार्यांनी उपस्थितांना जीवनोपयोगी मार्गदर्शन केले. भारतीय संस्कृती व संस्कार, आहार, विहार, आचरण, विचार, राहणीमान या दैनंदिन दिनचर्यांची आध्यात्मीक व वैज्ञानिक कर्मयोगी महत्व विशद केले. १३ मे रोजी मुदखेड शहरात आगमन होताच संकीर्तनासह शोभायात्रेसह नगर प्रतिक्षणा केली. या सोहळ्यासाठी शहरातील माहेरवासीनी, लेकी-बाळी व त्यांचे कुटुंबीय मित्रपरिवार व सर्व भाविकांनी श्री कालेजी देवीचे दर्शन, महाप्रसादाचा लाभ घेतला. या उत्सवानिमित्त पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण होते.

श्री कालेजी देवी कलशारोहण उत्सवानिमित्त नांदेडचे खा. रविंद्र चव्हाण, पप्पू पाटील कौंढेकर यांनीही भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. गावकरी मंडळींच्या वतीने या संपूर्ण उत्सवाची सूत्रबद्ध आखणी करण्यात आली होती. यावेळी भागवत कथाकार ह.भ.प. अमोल महाराज नलेगावकर (भगवतकर) यांच्या मधुर वाणीतून भक्ती, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा सुंदर संदेश मिळाला. यावेळी कालीदास महाराज, गुंज टाकळीचे महाराज व श्री श्री विद्यारण्य भारती जगद्गुरु शंकराचार्य हंपी महासंस्थान हंपी (कर्नाटक) यांची उपस्थिती प्रेरणादायी ठरली.

# कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांची एमजीएम परीक्षा केंद्राला भेट



**नांदेड (प्रतिनिधी) –**एमजीएम येथे बीसीए आणि एमसीए या परीक्षा सुरू असून, या परीक्षा केंद्राला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी नुकतीच भेट दिली. भेटी दरम्यान परीक्षा शिस्तबद्ध सुरू असल्याबद्दल तसेच एमजीएम येथे परीक्षा हॉल व परिसर स्वच्छ असल्याबद्दल कुलगुरू डॉ. चासकर यांनी समाधान व्यक्त केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे अनेक परीक्षा केंद्राला भेट देत असून, त्यांनी एमजीएम येथे बीसीए आणि एमसीए परीक्षा सुरू असताना या परीक्षा केंद्राला अचानक भेट दिली. या भेटीमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांची परीक्षा देण्यासाठी असलेली आसन व्यवस्था, परीक्षा हॉल, महाविद्यालयाचा परिसर आणि निटनेटकेपणा तसेच स्वच्छतेबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी संगणकशास्त्र विभागाचे प्राचार्य डॉ. शिरीष कोटगिरे यांची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय महामार्गाची दुरावस्था; चक्काजाम आंदोलनाचा इशारा



**किनवट (प्रतिनिधी) –** किनवट तालुक्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ - एची दुरावस्था दिवसेंदिवस गंभीर बनत असून, रस्त्यावरील खड्डे, भेगा आणि रखडलेल्या दुरुस्ती कामांमुळे वाहनचालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाकडून वारंवार आश्वासने मिळूनही प्रत्यक्ष काम सुरू न झाल्याने संतप्त नागरिकांनी दि. २० मे रोजी चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते बबन वानखेडे यांनी दिली.

राष्ट्रीय महामार्ग १६१ एची अल्पकाळातच मोठी दुरावस्था झाली आहे. यासंदर्भात नागरिकांच्यावतीने दि. १८ मार्च रोजी संबंधित प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभाग, नांदेड कार्यालयाने पत्राद्वारे रस्त्याच्या दुरुस्तीबाबत आश्वासन दिले होते. गोकुंदा परिसरातील रस्त्याच्या दुरुस्ती व देखभाल कामासाठी तब्बल ९२ लाख ७९ हजार ५२५ रुपयांचा प्रस्ताव मंजूर झाल्याचे सांगण्यात आले होते. तसेच रस्त्यावरील भेगा तातडीने बुजविण्याच्या सूचना संबंधित ठेकेदाराला देण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले होते.दरम्यान, १६ मार्च रोजी ई-प्रोक्युअरमेंट प्रणालीद्वारे संबंधित कामाची निविदा प्रस्ताव प्रसिद्ध करण्यात आला होता.

गोकुंदा येथील कि.मी. ९१/६०० ते कि.मी. ९२/ ८०० दरम्यान रस्त्याच्या दुरुस्तीचे काम लवकरच सुरू होईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले होते. या आश्वासनावर विश्वास ठेवून नागरिकांनी यापूर्वी प्रस्तावित आंदोलन स्थगित केले होते. मात्र, दोन महिन्यांनंतरही प्रत्यक्षात कोणतीही कामे सुरू झालेली नसून, रस्त्याची अवस्था आणखी बिकट झाली आहे. वाहनचालक, व्यापारी तसेच स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# नायगाव तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी मनोज देमेवार



**शंकरनगर (प्रतिनिधी) –** नांदेड जिल्ह्यातील केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या नायगाव तालुकाध्यक्षपदी साईकृपा एजन्सीचे मालक मनोज मोहनराव देमेवार यांची निवड करण्यात आली आहे.

शनिवार, दि. १६ मे रोजी नामनिर्देशित अर्ज माघार घेण्याची तारीख होती. यामध्ये तिघांचे नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यात आले होते व शेवटी दोघांनी माघार घेतल्यामुळे मनोज देमेवार यांची बिनविरोध निवड झाल्याचे नांदेड जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे निवडणूक अधिकाऱ्यांनी घोषित केले. या निवडीबद्दल नायगाव तालुक्यातील केमिस्ट संघटनेच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.

केमिस्ट बांधवांच्या न्याय्य मागण्या सोडविण्यासाठी मनोज देमेवार हे प्रयत्नशील राहतील असा विश्वासन अनेकांनी व्यक्त केला. निवडीनंतर अनेकांनी त्यांचे अभिनंदन केल्यानंतर मनोज देमेवार यांनी सर्व केमिस्ट बांधवांचे आभार मानले. ही निवड माझ्यासाठी सर्व केमिस्ट बांधवांनी टाकलेला विश्वास आहे. त्यामुळे या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. केमिस्ट संघटनेच्या कोणत्याही कामासाठी सदैव तत्पर्य राहील, अशी ग्वाही मनोज देमेवार यांनी दिली.

नायगाव तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# राहेर नगरीत गुरुपुष्यामृत योगनिमित्त धार्मिक सोहळा

## १०२८ भक्तांकडून गुरुचरित्र पारायण; परिसरात भक्तिमय वातावरण



**नायगाव (प्रतिनिधी)–** सद्‌गुरू समर्थ संत शिरोमणी बाळगीर महाराज यांच्या पावन जन्मभूमी राहेर येथे गुरुपुष्य अमृत योगानिमित्त धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यानिमित्त संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे. आगामी २०२८ च्या प्रस्तावित महाकुंभ मेळ्याच्या तयारीची ही नांदी मानली जात आहे.

अष्टकौशल्य सन्मानित परमपूज्य श्री श्री श्री १००८ महंत नारायणगीर महाराज गुरु बाळगीर महाराज यांच्या प्रेरणेतून तब्बल १०२८ भक्तांच्या सहभागाने गुरुचरित्र पारायण आयोजित करण्यात आले आहे. अधिकमास आणि गुरुपुष्य अमृत योगाचे औचित्य साधून आयोजित धार्मिक उपक्रमामुळे राहेरसह पंचक्रोशीत भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

या सोहळ्यात आनंद दत्त पहारा, विविध गावांतील भक्तांकडून महाराजांचा तुलाभार, संत रुद्रगीर महाराज किवळेकर यांचे कीर्तन तसेच आनंद दत्त महापूजेचा कार्यक्रम होणार आहे. हजारो भाविकांसाठी पुरणपोळीच्या महाप्रसादाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. गतवर्षीही येथे १०२८ भक्तांकडून पारायण, दत्त पहारा व कीर्तन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला होता. या वेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते संत निवासाचे भूमिपूजन करण्यात आले. यंदाचा सोहळा अधिक उत्साहात पार पडणार असून, श्रद्धा, सेवा आणि अध्यात्माचा महासंगम अनुभवायला मिळणार असल्याचे संयोजकांनी सांगितले.

# अर्धापूर तालुका भाजप युवा मोर्चाची ४१ जणांची कार्यकारिणी जाहीर



**अर्धापूर (प्रतिनिधी) –** तालुक्यातील भाजप युवा मोर्चाच्या सक्रिय कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेऊन भाजयुमोची तालुका कार्यकारिणी १५ जणांची तर शहर कार्यकारिणी २६ जणांची अशी ४१ जणांची जंबो कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली आहे.

माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजयाताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तर भाजप जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. किशोर देशमुख, नांदेड कृऊबाचे सभापती संजय देशमुख लहानकर, भाऊरावचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, भाजप तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे यांच्या सुचनेवरून भाजयुमोचे तालुकाध्यक्ष पवन इंगोले यांनी भाजयुमोच्या ता. सरचिटणीसपदी परमेश्वर बंडाळे, कुश भांगे, तर तालुका उपाध्यक्षपदी कोंडीबा सूर्यवंशी, हेमंत देशमुख, भीमराव गव्हाणे, रवी शिंदे, संतोष कदम, संभाजी शिंदे, तालुका चिटणीस बाबुराव क्षीरसागर, योगेश दुधाटे, प्रसेनजित लोणे, नारायण आढाव, मुंजाजी बारसे, अंकुश कदम, तसेच कोषाध्यक्षपदी अरुण क्षीरसागर यांची तर भाजयुमोच्या अर्धापूर शहराध्यक्षपदी तुकाराम माटे, शहर सरचिटणीसपदी व्यंकटी लंगडे, गजानन माटे, शहर उपाध्यक्षपदी आकाश साखरे, लवराज माटे, शंकर डोलारकर, मारुती जाधव, देविदास गव्हाणे, साईनाथ सौदागर, शहर चिटणीसपदी राणोजी महाकाळ, मारुती शेटे, शुभम लुटे, प्रशांत वाघुतकर, कोषाध्यक्षपदी अमित साबळे, शहर सदस्यपदी विकास गुरखेल, सूर्यकांत बोराटे, आनंदा वनटनकर, मन्मथ हिंगमिरे, लक्ष्मण गाढवे, नवीन वनटनकर, ज्ञानेश्वर पवार, दीपक सौदा, सुमित सिनगारे, गणपती बारसे, शंकर करंडे, गजानन गरड यांची ४१ जणांची भाजप युवा मोर्चाची जंबो कार्यकारिणीची निवड झाल्याचे नियुक्ती पत्राद्वारे कळविले आहे.

नवनिर्वाचित भाजप युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांची निवड झाल्याबद्दल नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, राज्य समिती सदस्य डॉ. लक्ष्मण इंगोले, संचालक निळकंठराव मदने, राजू बारसे, सरपंच विजय भुस्से, जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, भाजपाचे आनंदराव भंडारे, भाजप शहराध्यक्ष योगेश हाळदे, गुरूराज रणखांब, प्रमोद कल्याणकर, ईश्वर कपाटे, माजी नगरसेवक तुकाराम साखरे, माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव भालेराव, युवा नेते विराज देशमुख, विठ्ठल काकडे, माजी तालुकाध्यक्ष जठन मुळे, राजू लोणे, संतोष पवार, खंडेराव मस्के, गौतम सावते, स्वप्नील राठोड, अनिल बच्चेवार, परमेश्वर लालमे यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# महानगरपालिका व युनियन बँक ऑफ इंडिया यांच्यात 'सॅलरी अकाउंट लिंकेज स्कीम' सामंजस्य करार सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी) –**येथील महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हितासाठी आणि बँक व्यवहारांना अधिक सुलभ करण्यासाठी मनपा आणि युनियन बँक ऑफ इंडिया यांच्यामध्ये Employee Salary account Linkage Scheme अंतर्गत सामंजस्य करार (MOU) करण्यात आला आहे. या करारावर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे एका सोहळ्यात दोन्ही संस्थांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

नांदेड- वाघाळा शहर महानगरपालिका आणि युनियन बँक ऑफ इंडिया यांच्यात कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ऐतिहासिक सामंजस्य करार सोहळा शनिवार, दि.१६ मे रोजी नियोजन भवन येथे पार पडला. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचप्रमाणे महापौर कविता मुळे, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, युनियन बँक ऑफ इंडियाचे जनरल मॅनेजर लोकनाथ साहु, डिप्टी झोनल हेड निरंजन बारीक,



असिस्टंट जनरल मॅनेजर सावन शिव, रिजनल मॅनेजर प्रमोद पऱ्हाते, महिला व बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, उपसभापती निरंजना लांडगे, सभागृह नेता महेश कनकदंडे, गटनेता स.मुजीब स.मुख्तार, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, उपायुक्त अभिजीत वायकोस, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, नितीन गाढवे, विविध प्रभागाचे नगरसेवक आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे स्वागत केल्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे यांनी केले. त्यांनी या सामंजस्य कराराची पार्श्वभूमी व कर्मचाऱ्यांना होणारे लाभ यावर प्रकाश टाकला. तदनंतर युनियन बँकेच्या वतीने असिस्टंट जनरल मॅनेजर सावन शिव व बँकेच्या प्रबंधक पौर्णिमा मुंडे यांनी या करारामुळे पालिका कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सोईसुविधेसंदर्भात सादरीकरण केले.

या करारानुसार महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना युनियन बँकेमार्फत विशेष वेतन खात्याच्या अत्याधुनिक आणि डिजिटल बँकिंग सुविधा पुरवल्या जातील. महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी आणि वित्तीय सुरक्षेसाठी हा एक महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. या करारानुसार मनपाच्या सर्व कर्मचाऱ्यांना खात्यात किमान रक्कम ठेवण्याची कोणतीही सक्ती नसेल. तसेच या वेतन खात्यांतर्गत कर्मचाऱ्यांना अपघाती मृत्यू आणि कायमचे अपंगत्व आल्यास तब्बल एक कोटी रुपयांचे मोफत वैयक्तिक अपघात विमा संरक्षण दिले जाईल. आपत्कालीन प्रसंगी कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनाच्या मर्यादेत तात्पुरती ओव्हरड्राफ्ट म्हणजेच आगाऊ रक्कम उचलण्याची विशेष सवलत मिळेल. त्याचप्रमाणे गृहकर्ज, वाहनकर्ज किंवा वैयक्तिक कर्जासाठी अर्ज करताना प्रक्रिया शुल्कात व व्याज दरात विशेष सूट दिली जाईल. त्याबरोबर अमर्यादित एटीएम ट्रान्झॅक्शन, मोफत प्लॅटिनम/रुपे डेबिट कार्ड, मोफत चेकबुक आणि इंटरनेट बँकिंग व एसएमएस सुविधा मोफत पुरवल्या जातील. विशेष बाब म्हणजे अगदी नाममात्र विमा शुल्कावर कर्मचाऱ्यांना ३३ लाखांचा आरोग्य विमा मिळणार आहे.

# प्रगतीमंत्र

# ज्वेलरी डिझायनिंग

**तुम्हाला दागिन्यांची आवड आहे! तुमच्याकडे त्याच्या डिझायनिंगविषयी विविध कल्पनाही आहेत! मग ज्वेलरी डिझायनिंग हे तुमच्यासाठी उत्तम करिअर ठरेल...**

आजच्या युगात वावरताना आपलं फॅशन स्टेटमेंटही उत्तम असायलाच हवं. फॅशन जगतात रोज नव्याने येणाऱ्या ट्रेंड्सनुसार तयार होणं ही आज सगळ्यांचीच गरज बनली आहे. या ट्रेंडमधीलच एक महत्त्वाचा भाग असतो, दागदागिन्यांचा.



पारंपरिक आणि आधुनिकता यांचा मिलाप साधणारे अनेक ट्रेंड्स रोज नव्याने ज्वेलरी इंडस्ट्रीत दाखल होत आहेत. हे सारं पाहता, ज्वेलरी डिझायनिंग हे करिअरसाठी एक उत्तम क्षेत्र असल्याचं लक्षात येतं. ज्वेलरी डिझायनिंग हे कल्पक असं क्षेत्र आहे. इथे काम करताना दागिन्यांच्या विविध डिझाइन्स बनवण्याचं ज्ञान तुमच्याकडे असणं गरजेचं आहे. त्याचबरोबर ते दागिने त्याच प्रकारे बनवून घेण्याची माहितीही तुम्हाला असायला हवी. ज्वेलरी डिझायनर म्हणून काम करताना दागिन्यांच्या नवीन डिझाइन्स तयार करणं आवश्यक आहे. नवीन कल्पना जन्माला घालणं आणि त्या कागदावर रेखाटणं ही ज्वेलरी डिझायनरची प्राथमिक कामं आहेत. या क्षेत्रात काम करायचं, तर शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेणं आता गरजेचं बनू लागलं आहे. या प्रशिक्षणादरम्यान तुम्हाला स्टोन कटिंग (हिरे, माणकं, पाचू हव्या त्या आकारानुसार कापून घेणं), त्यांना पैलू पाडणं आणि सोनं-चांदी-प्लॅटिनम आदी धातूंना पॉलिश करणं आदी सर्व बाबींचं मूलभुत प्रशिक्षण दिलं जातं. या प्रशिक्षणात तुम्हाला इलेक्ट्रोप्लेटिंग, मेटल कलरिंग, अँडॉयझिंग, एनॅमेलिंग आणि स्टोन सेटिंग यासारखी स्पेशलाइझ्ड कामांचंही प्रशिक्षण दिलं जातं. विविध प्रकारचे खडे (स्टोन्स) ओळखणं, डिझायनिंगच्या संकल्पना, सादरीकरण (प्रेझेंटेशन), ज्वेलरी कॉस्टिंग आणि ज्वेलरी मेकिंग आदी विषयांचं ज्ञानही या प्रशिक्षणात दिलं जातं. काही संस्थांमधील कोर्सेसमध्ये कम्प्युटरच्या सहाय्याने ज्वेलरी आणि ॲक्सेसरीज डिझाइन करायला शिकवलं जातं. प्रत्यक्ष काम करताना किंवा तांत्रिक बाबतीत बोलायचं तर तुम्हाला सोनं- चांदी- प्लॅटिनम आदी मौल्यवान धातूंपासून दागिने कसे बनवायचे याचं प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक दिलं जातं. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना ज्वेलरी डिझायनिंग कोर्समध्ये ॲस्थेटिक (कलात्मकदृष्ट्या) आणि टेक्निकल (तांत्रिक) या दोन्ही पद्धतींचा अभ्यास करावा लागतो. तुमचा कोर्स पूर्ण झाला की, तुम्ही ज्वेलरी डिझायनर म्हणून काम करायला सुरुवात करू शकता.

## प्रवेश पात्रता...

या क्षेत्रात प्रवेश करायचा, तर किमान दहावी-बारावी पास असणं आवश्यक आहे. दहावीनंतर डिप्लोमा कोर्स करता येतो, तर बारावीनंतर डिग्री कोर्स करणं शक्य आहे. ग्रॅज्युएशननंतर शॉर्ट टर्म कोर्सेसही करता येतात. भारतातील अनेक संस्थांमध्ये ज्वेलरी डिझायनिंगचे लाँग टर्म, शॉर्ट टर्म तसंच, डिस्टन्स प्रोग्रॅम्स (दूरस्थ शिक्षण पद्धतीचे) उपलब्ध आहेत.

## करिअरच्या संधी...

उत्तम कल्पनाशक्ती, कलात्मक दृष्टी आणि या क्षेत्रातील कामाचा अनुभव असेल तर तुम्ही नक्कीच चांगली कारकीर्द घडवू शकता. मान्यताप्राप्त संस्थेतून ज्वेलरी डिझायनिंगचं शिक्षण घेण्याचाही फायदा होऊ शकतो. या आधारे ज्वेलरी डिझायनिंग इंडस्ट्रीत तुम्हाला नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध होतील. एखाद्या नामांकित ज्वेलरी ब्रँडकडे, दागिने बनवणाऱ्या आणि डिझाइन करणाऱ्या कंपनीकडे, दागिन्यांच्या पेढ्या, दुकानं (शोरुम्स), अँटिक आणि आर्ट ऑक्शन हाऊसेस आदी ठिकाणी तुम्हाला संधी उपलब्ध होतील. याशिवाय, फ्री लान्स काम करण्याचा किंवा स्वतःचं रिटेल व ट्रेडिंग युनिट सुरू करण्याचा पर्यायही तुमच्यासमोर आहे.



## प्रशिक्षण संस्था

- द इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जेम्स अँड ज्वेलरी (आयआयजीजे)
http://www.iigj.org/
- जेडी इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी
www.jdindia.com

हे दोन्ही कोर्स तुम्ही जगाच्या कुठच्याही कोपऱ्यातून करू शकता. या दोन्ही कोर्सचा अभ्यासक्रम आधी माहीत करून घ्या. पात्रता, निकष आणि आवश्यकता समजून घेतल्यावर नक्की काय करायचं हे ठरवणं थोडं अधिक सोपं होईल. त्याचबरोबर आपला अंतिम निर्णय घेण्यापूर्वी स्वतःच्या क्षमता आणि गुण यांच्याकडे लक्ष द्या.

# दहावीनंतर 'या' पर्यायांचा करा विचार...



**दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडे करिअर करण्यासाठी अनेक पर्याय असतात. परंतु दहावीनंतर आपण कोणता कोर्स निवडता यावर हे तुमचं पुढील भवितव्य अवलंबून असतं. दहावीनंतर विद्यार्थी विविध व्यावसायिक अभ्यासक्रम करू शकतात. दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आयटीआय अभ्यासक्रमदेखील खूप लोकप्रिय आहेत. आयटीआयमध्ये बरेच ट्रेंड असतात, ज्यातून विद्यार्थी त्यांच्या आवडीचे विषय निवडू शकतात.**

## आयटीआय

आयटीआय अभ्यासक्रम खूप लोकप्रिय आहेत. आयटीआयमध्ये बरेच ट्रेड आहेत, जे विद्यार्थी त्यांच्या पसंतीनुसार निवडू शकतात. काही लोकप्रिय कोर्स असे : आयटी टर्नर, आयआयटी मेकॅनिक, आयटी वेल्डर, आयटी प्लंबर, आयटीआय इलेक्ट्रीशियन.

## फाइन आर्ट्स, परफॉर्मिंग आर्ट्स

आर्ट अॅण्ड क्रॉफ्ट, सिरॅमिक अॅण्ड पॉटरी, डान्स, ड्रॉइंग, फर्निचर अॅण्ड इंटेरिअर डिझाइन, म्युझिक, स्कल्प्चर अशा कलेशी संबंधित विषयांमध्येही करिअर होऊ शकतं. मात्र त्यासाठी विषयाची आवड आणि कौशल्य लागतं. लहानपणापासून या विषयांचा अभ्यास केला तर त्यात करिअरसाठी उत्तम संधी आहेत.

## बॅचलर इन डिझायनिंग

काळानुरुप प्रत्येक वस्तूचं डिझाइन बदलत राहतं. प्रत्येक वस्तू वेगळ्या पद्धतीने प्रेझेंट केली जाते. हे डिझाइन करण्यासाठी प्रोडक्ट डिझाइन, फर्निचर अॅण्ड इंटिरिअर डिझाइन, सिरॅमिक अॅण्ड ग्लास डिझाइन, ग्राफिक डिझाइन, ॲनिमेशन, व्हिडिओ कम्युनिकेशन अशा प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मात्र यासाठी केवळ चित्रकला पुरेशी नसून कल्पनाशक्तीची गरज असते.



## सायन्स

- पीसीएमबी : बारावीतील फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथ्स आणि बायोलॉजी या चारही विषयांवर आधारित बायो केमिस्ट्री, बायो मेडिकल इंजिनीअरिंग, बायो टेक्नॉलॉजी, बायो इन्फॉर्मेटिक्स, फार्मसी अशा विषयांकडे जाता येतं.
- पीसीएम : या विषयांनुसार आर्किटेक्चर, डिफेन्स, नेव्ही, इंजिनीअरिंग, पायलट ट्रेनिंग, टेक्नॉलॉजीकडे वळता येतं.
- पीसीबी : मेडिकल, व्हेटर्नरी सायन्स अॅण्ड ॲनिमल हजबण्डरी, पॅरामेडिकल कोर्सेस, ॲग्रीकल्चर सायन्स अशा विषयांसाठी हा ग्रुप उपयोगी पडतो.
- एव्हिएशन, फूड सायन्स, फोरेन्सिक सायन्स, एन्व्हायर्न्मेंटल सायन्स, मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी, बायो टेक्नॉलॉजी, लाइफ सायन्स, मॅथमेटिक्स यात पदवी अभ्यासक्रम करता येतो. हे सर्व कोर्स चार ते पाच वर्षांचे असून त्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागते.

## डिप्लोमा

दहावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अभियांत्रिकी विषयात डिप्लोमा करू शकतात. त्यासाठी दहावीत गणित व विज्ञान विषय विद्यार्थ्यांनी घेतलेले असावेत. हे डिप्लोमा कोर्स ३ वर्षांचे असतात. काही डिप्लोमा अभ्यासक्रमांची नावे अशी : डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजीनियरिंग.डिप्लोमा इन टेक्सटाइल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन सिविल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन आयसी इंजीनियरिंग, डिप्लोमा इन ईसी इंजीनियरिंग, डिप्लोमा इन माइनिंग इंजीनियरिंग. या डिप्लोमा अभ्यासक्रमांनंतर विद्यार्थ्यांना थेट इंजिनीअरिंगच्या पदवीला प्रवेश मिळतो.

## उद्योजक व्हा

करिअरसाठी तुमच्याकडे भरपूर संधी उपलब्ध आहेत. पण फक्त नोकरी करण्याच्या विचाराने त्याकडे पाहू नका. मनात कायम जिज्ञासा ठेवली, झोकून काम केलं, चिकाटी, प्रामाणिकता, गणिती वृत्ती ठेवली तर व्यवसायातही यश मिळू शकतं. चांगल्या मार्गाने पैसे कमावण्याचा विचार आणि व्यवहारी वृत्ती ठेवली पाहिजे. तरुणांना स्वयंरोजगार निर्माण करता येईल, या हेतूने शासनाने पॉलिटेक्निक कोर्स सुरू केले. मात्र शासकीय तसंच खासगी संस्थांमधून बाहेर पडणारी मुले केवळ नोकरीचाच विचार करतात. स्वतः उद्योग सुरू करून इतरांना नोकरी देत नाहीत. त्यामुळे नोकऱ्यांचा तुटवडा निर्माण होतो.

# आरोग्यसेवेत संधींचा पाऊस!



**आरोग्यसेवा क्षेत्राला मंदीचं सावट कधीच सतावणार नाही असं मानलं जातं. वेगानं वाढणाऱ्या या क्षेत्रात काम करण्यासाठी, विविध प्रकारची कौशल्यं असलेल्या सुशिक्षित तरुण-तरुणींची गरज आहे. २०२२ पर्यंत या क्षेत्रात तसंच याच्याशी संलग्न सेवाक्षेत्रात आणखी पाच कोटी नोकऱ्या उपलब्ध होतील असा अंदाज आहे. या संधींविषयी...**

आपल्या देशात सर्वसामान्य जनतेला आरोग्यसेवा पुरवणं ही नेहमीच सरकारी आरोग्ययंत्रणांची जबाबदारी मानली गेली. मोठमोठी हॉस्पिटल्स ही सरकारी वा सेवाभावी संस्थांनीच चालवावीत असा प्रघात होता. पण आता हे चित्र झपाट्यानं बदलत आहे. देशाच्या विकासामुळे आरोग्यसेवांची व्याप्ती सतत वाढत चालली आहे. पण त्या पुरवणाऱ्या यंत्रणा, विमा कंपन्या, सरकारी प्रशासकीय खाती व ग्राहकांसमोरही वेगवेगळ्या समस्या उभ्या राहत आहेत.

## प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज

जागतिक स्तरावरील चित्र बघितल्यास असं दिसतं की, आरोग्यसेवा तसंच संबंधित आरोग्य व्यवस्थापन यंत्रणा वा श्रृंखला, वैद्यकीय उपकरणं व यंत्रं, औषधं व ड्रग्ज निर्मिती, जैवतंत्रज्ञानविषयक संशोधनसंस्था आणि प्रमुख आरोग्यसेवांना आधारभूत ठरणाऱ्या अनेक उपयंत्रणा, जसं ब्लडबँक्स, डेंटल क्लिनिक्स, ऑप्टोमेट्री, व्हेटर्नरी, स्ट्रेस कंट्रोल सेंटर्स, पॅथॉलॉजी लॅब्स इत्यादींच्या गुंतागुंतीने बनलेल्या या क्षेत्राचा आवाका व उलाढाल दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. २०२२ मध्ये भारतातल्या आरोग्यनिगा (हेल्थकेअर) क्षेत्राची उलाढाल २०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचणार असून, यातली ७१ टक्के वाढ ही केवळ हॉस्पिटल्समधून घडताना दिसणार आहे असं जाणकारांचं म्हणणं आहे. आरोग्यविषयक जागरूकता, वाढत चाललेले आयुर्मान, वृद्ध व्यक्तीची वाढती संख्या अशा विविध घटकांमुळे देशांतर्गत आरोग्यव्यवस्थांची गरज व मागणी वाढत चालली आहे. भारतीय तज्ज्ञ डॉक्टरांनी आपली प्रयोगशीलता आणि नवसंशोधनाद्वारे मानवी जीवन निरोगी, निरामय व्हावे यासाठी नवनव्या उपचारपद्धती शोधून काढल्या. परवडणाऱ्या उत्तम दर्जाच्या आरोग्यसेवा उपलब्ध झाल्यामुळे देशोदेशीचे रुग्ण उपचार करून घेण्यासाठी भारताकडे धाव घेऊ लागले आहेत. त्यातून मेडिकल टुरिझमच्या विकासाला चालना मिळाली आहे. पुढील काळात या क्षेत्राची व्याप्ती प्रचंड वेगाने वाढणार आहे. त्यामागील कारणे शोधली असता समोर येते ते हेल्थकेअर व औषध उत्पादनक्षेत्रात होणारी विलीनीकरणं व अधिग्रहणं, ई-कॉमर्स - रिटेल हेल्थकेअरचा होऊ घातलेला मोठा विकास. हॉस्पिटल श्रृंखला, जैवतंत्रज्ञान, आरोग्य विमा, यंत्रं व उपकरणं, आरोग्यशिक्षण, वेलनेस सेंटर्स व स्पा, वृद्धाश्रमांच्या आधुनिक आवृत्त्या, अपंग पुनर्वसन केंद्रं, सल्लागार अशा विविध सेवा-उपसेवांचा विस्तार. या सर्वांनाच प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज भासणार आहे.



## आरोग्यविषयक आव्हानं...

- वृद्धत्वाकडे झुकलेल्या व्यक्तींची वाढती संख्या.
- दीर्घ मुदतीच्या व पुनरावृत्ती होणाऱ्या आजारांचं वाढतं प्रमाण.
- आरोग्यसेवांच्या वाढत्या किंमती व दर्जातली असमानता.
- आरोग्यविषयक पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षित मनुष्यबळाच्या तुटवड्यामुळे दुर्गम भागातल्या रुग्णांपर्यंत सेवा न पोहोचणं.
- जैवतंत्रज्ञान व तंत्रज्ञानात सतत होणाऱ्या संशोधनामुळे होणारे फायदे तसंच त्यातून उद्भवणाऱ्या समस्यांमुळे या क्षेत्रातल्या गुंतागुंतीत पडलेली भर.

## आरोग्य क्षेत्रात यशस्वी करिअरसाठी हे गुण हवे...


- इतरांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्याची जिद्द.
- ग्राहक, रुग्णसेवेप्रति निष्ठा. स्वयंस्फूर्त व्यक्तिमत्व.
- आव्हानांचा सामना करण्याची क्षमता.
- व्यवहारचातुर्य, प्रगल्भता व व्यावसायिकता.
- संवाद-कौशल्य, विविध स्वभावांच्या व विविध स्तरांवरील व्यक्तींशी जुळवून घेण्याची कला.
- सहकाऱ्यांकडून शिकणं-शिकवणं, टीममधल्या सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची हातोटी.
- सर्वात महत्त्वाचं - संवेदनशीलता व सहानुभूती.



**आरोग्य क्षेत्रात केंद्रस्थानी असलेल्या आयुर्विज्ञान व तांत्रिक स्वरूपाच्या नोकऱ्यांसह इतर पदांसाठीदेखील व्यवस्थापन कौशल्यं आत्मसात केलेल्या अनेक तरुण- तरुणींची मध्यम व्यवस्थापकीय स्तरावर कार्यरत होण्यासाठी गरज भासणार आहे. वैद्यकीय वा तंत्रज्ञानाची पार्श्वभूमी नसलेल्या तरुण- तरुणींनादेखील या क्षेत्रात कोणत्या प्रकारच्या करिअर्स करता येतील त्यांचा आढावा घेऊ या.**

## 'त्या' तरुण-तरुणींनाही संधी...

- प्रशासन व कार्यविधी / व्यवहार : हॉस्पिटल वा औषध उत्पादन कंपनीच्या केंद्रस्थानी असणारा हा महत्त्वाचा विभाग आहे. आजच्या हॉस्पिटल श्रृंखला व सुपरस्पेशॅलिटी हॉस्पिटल्सच्या काळात त्यांनादेखील कॉर्पोरेट क्षेत्राप्रमाणेच प्रमुख कार्यकारी अधिकारी आणि त्याच्या हाताखाली उत्तम प्रशासकीय टीम असण्याची गरज भासू लागली आहे.
- सुरक्षा, आरोग्य, पर्यावरण रक्षण : परिसर स्वच्छता, घन-द्रव कचरा-वायू प्रदूषण व्यवस्थापन, विशेषतः ऑपरेशन थिएटर्स-ओपीडी-इतर क्लिनिकल कक्षातून निघणाऱ्या जैव-औषधी कचऱ्याचं योग्य व्यवस्थापन करून, पर्यावरणाचं संतुलन राखण्याची जबाबदारी यांच्यावर असते.
- दळणवळण व वाहतूक व्यवस्थापन : पोर्टर्स, ॲम्ब्युलन्स व इतर वाहतूकयंत्रणेची देखभाल व नियमिततेचे काटेकोर व्यवस्थापन.
- संशोधन : आरोग्यविषयक नवनवीन संशोधन करणे, विश्लेषण व त्यावर आधारित निष्कर्षांचा अहवाल प्रस्तुत करून रुग्णांसाठी नवनवीन उपचारपद्धती व औषधांचे शोध लावणं.
- खरेदी, स्टोअर : हॉस्पिटलमध्ये लागणारी उपकरणं, औषधांपासून गणवेशापर्यंत विविध गोष्टींची खरेदी, साठा आणि वितरणसाखळी उभी करणं. फारसा दृष्टीपथात न येणारा हा विभाग हॉस्पिटलसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. हॉस्पिटलच्या नफ्या-नुकसानात याची विशेष भूमिका व सहभाग तर असतोच, शिवाय एखादं उपकरण वा औषधाचा अचानक तुटवडा पडल्यास रुग्णांच्या जिवावर बेतून हॉस्पिटलची प्रतिष्ठा धोक्यात येऊ शकते म्हणून इतर विभागांप्रमाणे २४ X ७ कार्यरत राहणारे हे खाते आहे.
- सोयीसुविधा : बिल्डिंग व इतर पायाभूत सुविधा, यंत्रसामग्रीची देखरेख, स्वच्छता, खानपान व्यवस्था, लाँड्री इत्यादी विभाग यांच्या अखत्यारीत येतात.
- जनसंपर्क : रुग्ण, रुग्णांचे नातेवाईक, गरजू रुग्ण यांच्याशी संवाद साधून त्यांच्या अडचणी सोडवणं. परिसरातली जनता, प्रसारमाध्यमं, सेवाभावी संस्थांशी उत्तम संबंध ठेवणं.
- विपणन/पणन : आज प्रत्येक ब्रँडला स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मार्केटिंगची गरज आहे तशी ती हॉस्पिटलनादेखील आहे.
- कायदा व प्रशासन : केवळ हॉस्पिटलच नव्हे तर आरोग्यसेवांचा दर्जा आदी बाबतीत कायदेशीर बाबींची पूर्तता, रुग्णाचा अंतर्भाव ग्राहक सुरक्षा कायद्यामध्ये केल्यापासून यांची जबाबदारी कितीतरी पटीने वाढली आहे.
- मनुष्यबळ प्रशासन : हॉस्पिटलमधल्या विविध विभागांमध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व वैविध्यपूर्ण मनुष्यबळाच्या गरजांची पूर्ती करणं. तसंच त्यांच्या कौशल्यांची वृद्धी करण्यासाठी प्रयत्नशील राहणं.
- माहिती तंत्रज्ञान : हॉस्पिटलमधल्या सर्व यंत्रणांची स्थापना, दुरुस्ती व देखरेख व्यवस्थित करून कोणताही व्यत्यय येऊ न देता सेवा पुरवण्यात यांची अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका असते.



# ‘मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करणाऱ्या समितीत न्यायमूर्तींची गरज नाही





## केंद्र सरकारची सर्वोच्च न्यायालयात भूमिका

**मुंबई(प्रतिनिधी)**–राज्यात उष्णतेनं कहर केल्यानंतर पुन्हा अवकाळी पावसाचं संकट घोंगावत आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्यातील बहुतांश जिल्ह्यात अवकाळी पावसानं दमदार बॅटिंग केली आहे. या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतातली पिकांना बसला असून, होता–तोंडाशी आलेलं पीक अक्षरशः आडवं झालं आहे. परिणामी बळीराजा पुन्हा एकदा दुबार संकटात सापडला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यातील झापडे गावात जोरदार अवकाळी पावसाने अकरा एकर बागेचे म ोठे नुकसान झाले आहे. यात हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून, बळीराजा हवालदिल झाला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक भागात शनिवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. यात अकरा एकरमध्ये लावलेल्या पपई झाडांचं मोठं नुकसान झालं असून उभं पीक सुसाट्याच्या वाऱ्याने आडवं झालं आहे. यात वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने पपईचे पस्तीस लाखांचे नुकसान झाले आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक भागांत शनिवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. यात अकरा एकरमध्ये लावलेल्या पपई झाडांचं मोठं नुकसान झालं असून, उभं पीक सुसाट्याच्या वाऱ्याने आडवं झालं आहे. यात वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने पपईचे पस्तीस लाखांचे नुकसान झाले आहे. दुसरीकडे, अवकाळी पावसाचा तडाखा भंडाऱ्याला बसला असून ८०२.१० हेक्टरवरील पिकांचं नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. कृषी विभागाचा नजरअंदाज अहवाल समोर आला असून त्यातून ही नुकसानीची आकडेवारी पुढे आली आहे.

भंडारा जिल्ह्यात १ ते ६ मे दरम्यान झालेल्या सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे जिल्ह्यातील ७२ गावांतील ८०२.१० हेक्टर क्षेत्रातील पिकांना फटका बसलाय.

कृषी विभागानं त्यांचा प्राथमिक नजर अंदाज अहवाल तयार केला आहे. या आपत्तीमुळं २१२३ शेतकरी प्रभावित झाले आहे. नुकसानग्रस्त पिकांमध्ये उन्हाळी भात, मका, आंबा, भाजीपाला व अन्य फळपिकांचा समावेश आहे.

# तिरुवनंतपुरम–दिल्ली राजधानी एक्स्प्रेसच्या दोन बोगीमध्ये भीषण अग्नितांडव

## अवघ्या १५ मिनिटात ६८ प्रवाशांना बाहेर काढल्याने जीवितहानी टळली

**नवीदिल्ली (प्रतिनिधी)**– कोटा विभागात तिरुवनंतपुरम–हजरत निजामुद्दीन राजधानी एक्सप्रेस (१२४३१) च्या दोन डब्यांना आग लागली. हा अपघात रविवार, दि. १७ मे रोजी पहाटे सव्वा पाचच्या सुमारास कोटा विभागातील लुनीरिच्छा आणि विक्रमगड आलोट (मध्य प्रदेश) स्थानकांदरम्यान घडला. बी–१ क्रमांकाच्या बोगीत आणि त्याच्या मागे जोडलेल्या दुसऱ्या सामान–सह–गार्ड व्हॅनमध्ये आग लागली. अपघातानंतर कोटा जंक्शनवर सायरन वाजवण्यात आले. मदत आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक सौरभ जैन यांनी सांगितले की, डब्यात ६८ प्रवासी होते. कोणतीही जीवितहानी झालेली नाही. गार्डने सर्वप्रथम लोको पायलटला सतर्क केले.

त्यानंतर ट्रेन थांबवण्यात आली आणि प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. संपूर्ण डबा १५ मिनिटांत रिकामा करण्यात आला. काही मिनिटांतच आग संपूर्ण डब्यात पसरली होती. रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले की, आगीच्या कारणाचा तपास सुरू आहे.

तिरुवनंतपुरम राजधानी रविवारी पहाटे ३:४५ च्या सुमारास मध्य प्रदेशातील रतलाम जंक्शन येथून निघाली. तिचा पुढचा थांबा सकाळी ८:४५ वाजता कोटा जंक्शन होता. राजस्थानात प्रवेश करण्यापूर्वी विक्रमगड आलोट स्टेशनजवळ एका एसी डब्याला आग लागली. काही मिनिटांतच आग पुढच्या आणि मागच्या सामानाच्या डब्यांमध्ये पसरली. तेथे ठेवलेले प्रवाशांचे सामान जळून खाक झाले. या डब्यात एकही प्रवासी नव्हता.

अपघात झाल्यापासून दिल्ली–मुंबई रेल्वे मार्गावरील वाहतूक थांबवण्यात आली आहे. ट्रेनचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. डबा ट्रेनपासून वेगळाही करण्यात आला. सुमारे दोन तासांनंतर आग विझवण्यात आली. प्रवाशांना दुसऱ्या डब्यात हलवण्यात आले. सुमारे चार तासांनंतर सकाळी ९ वाजता ट्रेन कोटासाठी रवाना झाली. कोटा येथे ट्रेनला एक अतिरिक्त डबा जोडला जाईल, ज्यामध्ये अपघातग्रस्त डब्यातील प्रवाशांना हलवले जाईल. अपघातामुळे, मुंबई–जयपूर सुपरफास्ट (१२९५५) ही ट्रेन विक्रमगड आलोट स्थानकावर थांबवण्यात आली आहे.

# ज्येष्ठ अभिनेत्री उषा चव्हाण यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला दिलासा

**ठाणे (प्रतिनिधी)**– मराठी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री उषा चव्हाण यांच्या पुण्यातील धनकवडी येथील जमिनीच्या टीडीआरच्या विषयाबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना मोठा दिलासा दिला आहे. या प्रकरणी दोन्ही पक्षांची बाजू जाणून घेऊन अंतिम निर्णय देईपर्यंत त्यांनी या टीडीआर व्यवहाराला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे.

अभिनेत्री उषा चव्हाण यांच्या मालकीच्या या जमिनीबाबत निर्माण झालेल्या वादानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाहीर आवाहन करणारा एक व्हीडीओ त्यांनी समाज माध्यमावर टाकला होता. यानंतर त्यांचे पती दत्तात्रय कडू देशमुख यांनीही पुण्यातील काही प्रसार माध्यमांकडे त्यांची बाजू मांडली होती. २६ वर्षापासून त्यांचा या जमिनीचा वाद कोर्टात सुरू होता. अखेर न्यायालयाने त्यांचा मुलगा हृदयनाथ याचा या जमिनीवरील दावा मान्य



केला होता. मात्र तरीही पुण्यातील गोयल गंगा या खाजगी विकासकाने या जमिनीचा टीडीआर आपल्या नावे केल्याने उषा चव्हाण यांनी शिंदे यांच्याकडे आपल्याला न्याय मिळवून देण्याची मागणी केली होती.

आज सकाळी त्या ही मागणी घेऊन आपल्या मुलासह ठाण्यातील टेंभी नाका येथील आनंद आश्रमात आल्या. तिथे उपस्थित असलेल्या शिवसैनिकांना त्यांनी आपल्या येण्याचे कारण सांगितले. त्यांनी तत्काळ अभिनेते निर्माते मंगेश देसाई यांना याबाबत अवगत केले. त्यांनी उषा चव्हाण यांचे म्हणणे सविस्तर समजून घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याबाबत माहिती दिली. यानंतर शिंदे यांनी नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डी. गोविंदराज यांच्याशी संपर्क साधून, पुणे महानगरपालिकेने केलेला हा टीडीआर व्यवहाराला तात्पुरती स्थगिती द्यावी. तसेच दोन्ही पक्ष आणि विकासक तसेच पुणे मनपा यांची स्वतंत्र सुनावणी आपल्यासमोर घेण्यात यावी. यावेळी सर्व पक्षांनी आपापले म्हणणे आणि कागदपत्र सादर करावीत. सर्व बाबी तपासून त्यानंतरच या व्यवहाराला मान्यता देण्यात येईल असे स्पष्ट केले.

# नाशिकमध्ये घटसर्प रोगाच्या प्रादुर्भावाने २ चिमुकल्यांचा मृत्यू; आरोग्य यंत्रणा हादरली, नागरिकांमध्ये भीती

**नाशिक(प्रतिनिधी)** –गेल्या काही महिन्यात वेगवेगळ्या गुन्हेगारीच्या घटनांचं केंद्रबिंदु बनलेल्या नाशिक जिल्ह्यातून आता आरोग्यविषयक धक्कादायक बातमी समोर आली आहे. मालेगावात दोन चिमुकल्यांचा घटसर्प आजाराने मृत्यू झाल्याने आरोग्य यंत्रणा हादरली असून मालेगाव शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटसर्प आजार कालबाह्य झाल्याचा दावा शासनाकडून करण्यात येतो. मात्र, दोघ लहान मुलांच्या मृत्यूने मोठे प्रश्नचिन्ह उभारले असून वेगवेगळ्या लसीकरणानंतरही मृत्यूची घटना घडल्याने आरोग्य व्यवस्थेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मालेगावात शहरातील दोन लहान बाळांचा घटसर्प या गंभीर आजाराने मृत्यू झाल्याने संपूर्ण आरोग्य यंत्रणा हादरून गेली आहे. एकीकडे सरकार घटसर्प हा आजार जवळपास संपल्याचा दावा शासनाकडून केला जात आहे. तसेच दुसरीकडे लसीकरणावरही मोठा खर्च होत असताना दोन निष्पाप बालकांचा मृत्यू होतो, ही बाब अत्यंत गंभीर मानली जात असून, आरोग्य यंत्रणांवर मात्र प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मालेगावात वास्तव्यास असलेल्या राजस्थानी कुटुंबातील ही दोन बालके असल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, या घटनेमुळे मालेगाव शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर आता मोठे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, मालेगावात आरोग्याचे प्रश्न नेहमीच गंभीर स्वरूपाचे पाहायला मिळतात. कधी काळी कोरोनाचे हॉटस्पॉट मालेगाव बनलेले होते तर टायफाईड, डेंग्यू, मलेरिया, डायरिया आदी आजार तर नित्याचेच झालेले आहेत. त्यामुळे, महापालिका प्रशासन व आरोग्य यंत्रणांनी घटसर्प रोगाने बाधित दोन चिमुकल्यांचा मृत्यू गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

पावसाळ्याच्या तोंडावर घटसर्प ह्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव हा जनावरांमध्ये आढळून येतो. त्यालाच हेमोरॅजिक सेप्टिसिमिया नावाचा एक धोकादायक आजार असेही म्हणतात. त्यावर वेळीच उपाय झाला नाही तर जनावरे दगावण्याचाही धोका असतो. त्यामुळे वेळीच लसीकणर करुन घेणे हाच यामधील सर्वोत्तम पर्याय आहे. याचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी सध्या गावोगावी लसीकरण मोहिम सुरु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कसलाही विलंब न करता लसीकरण करुन घेणे गरजेचे आहे. विशेषत: गाई आणि म्हशीमध्येच याची लक्षणे आढळतात. शिवाय हा संसर्गजन्य आजार असल्याने त्याचा फैलावही लवकर होतो. हा आजार मे–जूनमध्ये होतो. हा एक जिवाणूजन्य रोग आहे. त्यामुळे त्याच्याविषयी माहिती असून उपचार पध्दती जाणून घेणे तेवढेच महत्वाचे आहे. दरम्यान, त्यामुळेच प्राण्यांची काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात पुणे–सोलापूर महामार्गावर आंदोलन; ७५ वर्षीय वृद्ध महिला शेतकरी सुद्धा रस्त्यावर



**पुणे (प्रतिनिधी)** –शक्तिपीठ महामार्गाविरोधात पुणे–सोलापूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी संतप्त होवून शक्तिपीठ महामार्गास विरोध केला आहे. रणरणत्या उन्हात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टींच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी महामार्ग रोखला.

संत सावता माळी यांची संजीवन समाधी असलेल्या अरणसह पंचक्रोशीच्या गावातील बाधित शेतकऱ्यांनी महामार्ग बंद करत आंदोलन केले.

अरण गावातील ७५ वर्षीय रतन निवृत्ती पाटील या वृद्ध शेतकरी महिलेने तळपत्या उन्हात रस्त्यावर बसून या महामार्गास विरोध केला. महामार्गावर रास्तारोकोवरून राजू शेट्टी आणि सोलापूर पोलीस यांच्यात शाब्दिक चकमक झाली. पोलिसांनी आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केल्यानंतर राजू शेट्टी संतप्त झाले.

बेमुदत आंदोलन करणार आहोत, काय करणार सांगा, अशी विचारणा करताच पोलीस नरमल्याचे दिसून आले. शक्तिपीठाला सरकारकडून जोर लावण्यात आल्यानंतर बाधित जिल्ह्यातून विरोध वाढत चालला आहे. कोल्हापूर जिल्ह्यात १९ मे रोजी सर्वपक्षीय मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

# निवडणुकीसह विविध कार्यालयांमध्ये प्रतिनियुक्तीवर गेलेल्या शिक्षकांना पुन्हा वर्गावर धाडणार

## शिक्षण संचालनालयाद्वारे परिपत्रक केले जारी

**मुंबई(प्रतिनिधी)**–मुंबईसह राज्यातील काही भागांमधील शिक्षक हे प्रतिनियुक्तीवर निवडणूक कामांसह इतर कामांसाठी व विविध कार्यालयांमध्ये रुजू झालेले असून शिक्षकांनी केवळ शिकवण्याचे काम करणे आवश्यक असतानाही काही शिक्षक कायमस्वरुपी निवडणूक व इतर विभागांमध्येच कार्यरत आहेत. त्यामुळे अशाप्रकारे निवडणूक विभागांमध्ये प्रतिनियुक्तीवर असलेल्या सर्व शिक्षकांना कार्यमुक्त करून घेत त्यांच्या मूळ जागांवर रुजू करून घेण्याचे परिपत्रकच १३ मे २०२६ रोजी प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे निवडणूक कामांसाठी कायमस्वरुपी जुंपलेल्या शिक्षकांना पुन्हा आपल्या जागांवर किंवा पर्यायी शाळांमध्ये जावून काम करावे लागणार आहे. मात्र, हे परिपत्रक प्रतिनियुक्तीवर शिक्षकांसाठी असून सध्या एसआयआर आणि जनगणनेच्या कामांसाठी जे बीएलओ नियुक्त करण्यात आलेले आहेत, त्यांना हे परिपत्रक लागू नसेल, त्यांना आपल्या ड्युटीबरोबरच जनगणनेचे आणि एसआयआरचेही काम करावेच लागेल, असे शिक्षण संचालकांनी स्पष्ट केले.

या परिपत्रकामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शिक्षण संस्थांमधील किती शिक्षक निवडणूक व अन्य कामांकरिता प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत, अशा शिक्षकांची प्रतिनियुक्तीने कार्यरत कालावधीसह माहिती तत्काळ सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. तसेच निवडणूक व अन्य कामांवर प्रतिनियुक्त असलेल्या सर्व शिक्षकांना त्यांचे मूळ आस्थापनेवर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्याचे निर्देश दिलेले आहेत. या निर्देशानुसार सर्व संबंधित शिक्षकांना (स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शिक्षण संस्थांमधील शिक्षक निवडणूक व अन्य कामाकरिता प्रतिनियुक्तीने कार्यरत असणाऱ्या) त्यांचे मूळ आस्थापनेवर रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत आपले स्तरावरुन उचित कार्यवाही करावी, असेही नमूद केले आहे.

कार्यालयास सादर केलेल्या माहिती व्यतिरिक्त शिक्षकांची प्रतिनियुक्ती शासकीय कार्यालयात असेल तर त्या कार्यालय प्रमुखांशी संपर्क करुन त्यांनाही कार्यमुक्त करण्याचे निर्देश द्यावेत. तसेच सर्व संबंधितांना कार्यमुक्त केल्याचे आदेशानंतरही शिक्षक जर मूळ आस्थापनेवर रुजू झाले नाही तर, त्या शिक्षकांचे मे, २०२६ म्हणजे जून २०२६ पासूनचे वेतन अदा होणार नाही याबाबत आपण दक्षता घ्यावी. याबाबत संबंधीत अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांना आपल्या स्तरावरुन आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत. तसेच शासन पत्राच्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शिक्षण संस्थांमधील किती शिक्षक निवडणूक व अन्य कामांकरिता प्रतिनियुक्तीने कार्यरत होते व किती शिक्षक हे मूळ आस्थापनेवर रुजू झालेले आहेत. याचा एकत्रित अहवाल ३१ मे २०२६ पर्यंत या कार्यालयास सादर करावा. जेणेकरुन एकत्रित



अहवाल सत्वर शासनास सादर करणे शक्य होईल, असेही नमूद केले आहे.

सध्या मुंबईतील अनेक खासगी अनुदानित शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांसह महापालिका शाळांमधील शिक्षकांना निवडणूक विभागामध्ये प्रतिनियुक्तीवर पाठवण्यात आले आहे, तर काही शिक्षक हे प्रशासकीय कामांसाठी करीरोड येथील शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात कार्यरत आहेत. त्यामुळे या सर्व प्रशासकीय कामे करणाऱ्या शिक्षकांना पुन्हा एकदा वर्गावर जावे लागणार असून त्यांना जर प्रशासकीय कामांमधून मुक्त करून वर्गावर न पाठवल्यास मे महिन्याचा पगारही मिळणार नसून त्यांना पुढील कारवाईला सामोरे जावे लागणार असल्याचे या परिपत्रकाद्वारे स्पष्ट झाले आहे.

# सार्वजनिक–खाजगी भागीदारीतून उभारलेले कर्करोग रुग्णालय आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरणार –मुख्यमंत्री

**पुणे(प्रतिनिधी)**– पुणे महानगरपालिकेच्या जागेवर सामाजिक बांधिलकी जपत उभारण्यात आलेले अत्याधुनिक कर्करोग रुग्णालय हे आरोग्य क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी पाऊल आहे. सार्वजनिक–खाजगी भागीदारीतून निर्माण झालेले हे केंद्र आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

पुणे महानगरपालिका आणि आपुलकी हेल्थकेअर यांच्या संयुक्त उपक्रमातून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कर्करोग केंद्राच्या लोकार्पणप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार भीमराव तापकीर, आमदार राहुल कुल, उपमहापौर परशुराम वाडेकर, महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कर्करोगाचे प्रमाण अतिशय वेगाने वाढत आहे. वेळेत निदान आणि उपचार मिळाल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो. मात्र उपचारात विलंब झाल्यास रुग्णांना दीर्घकाळ उपचार घ्यावे लागतात आणि त्यासाठी मोठा आर्थिक खर्चही करावा लागतो. हीच बाब लक्षात घेत सर्व–सामान्य नागरिकांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने विविध आरोग्य योजनांमध्ये कर्करोग उपचारांचा समावेश केला आहे.

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर ‘कर्करोग ग्रीड’ तयार करण्यात येत असून या माध्यमातून राज्यातील रुग्णांना अधिक सक्षम आणि सुलभ उपचार सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. राज्यभरातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी आणि समन्वयित करण्यासाठी हे ग्रीड महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

# ऑपरेशन प्रहार अंतर्गत ८ नक्षलवाद्यांना अटक

**गडचिरोली (प्रतिनिधी)** –नक्षलवादी चळवळीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी गडचिरोली पोलिसांनी राबविलेल्या ‘ऑपरेशन अंतिम प्रहार’ या मोहिमेला मोठे यश आले आहे. पोलिसांनी जिल्ह्यात सक्रिय असलेल्या सर्व ८ नक्षलवाद्यांना अटक केली असून, ३८ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या आणखी ५ नक्षलवाद्यांनी शनिवारी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले.



अटक करण्यात आलेल्या नक्षलवाद्यांमध्ये कंपनी क्रमांक १० चा विभागीय समिती सदस्य राजू मंगू वेको, त्याची पत्नी जन्नी उर्फ नगी येमला, जयराम गावडे, मुकेश अवलाम, विजय तामो, रजिता मडावी, ज्योती पोटावी आणि आमती पोडियाम यांचा समावेश आहे. या सर्वांवर शासनाने एकूण ६४ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. पोलिसांनी या आरोपींकडून एके–४७, एसएलआर आणि अन्य बंदुकांसह ६५ लाख ३४ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे.

७ फेब्रुवारी २०२६ रोजी भामरागड जवळील फोदेवाडा जंगलात झालेल्या चकमकीत एक पोलीस जवान शहीद झाला होता. या हत्येमध्ये अटकेतील काही नक्षलवाद्यांचा सहभाग होता. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी यातील ४ जणांना तेलंगणातून, दोघांना कुमनार येथून आणि दोघांना नैताळा येथून अटक केली, अशी माहिती पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी पत्रकार परिषदेत दिली.


दुसरीकडे, पोलिसांसमोर शरणागती पत्करलेल्या ५ नक्षलवाद्यांमध्ये एक विभागीय समिती सदस्य, एक प्लाटून समिती सदस्य, एक क्षेत्रीय समिती सदस्य आणि दोन दलम सदस्यांचा समावेश आहे. मधु उर्फ राकेश वेळदा, जीवन उर्फ जग्गू मडकाम, रजनी उर्फ दुर्गा धुर्वा, मंगली कुरसाम आणि लक्ष्मी पुनेम अशी आत्मसमर्पण केलेल्यांची नावे आहेत. या कारवाईमुळे गडचिरोली जिल्ह्यातील नक्षल्यांविरुद्धचा सशस्त्र संघर्ष संपला असल्याचे पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी सांगितले. मात्र, नक्षलवादी विचारधारा लगेच संपत नसल्यामुळे, इतर राज्यांतून नक्षलींनी जिल्ह्यात पुन्हा प्रवेश करू नये यासाठी पोलीस यापुढेही सातत्याने लक्ष ठेवून राहतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

# खरीप हंगामाच्या तोंडावर हिंगोलीत डिझेलचा तुटवडा

**हिंगोली(प्रतिनिधी)**– हिंगोली जिल्ह्यात खरीप हंगामाच्या तोंडावर डिझेलचा गंभीर तुटवडा निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा साठा संपल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. गोरेगाव येथील पेट्रोल पंपावर तर डिझेल मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी कॅन घेऊन पहाटेपासूनच लांबच लांब रांगा लावल्या आहेत. सकाळी सहा वाजल्यापासून शेतकरी डिझेलच्या प्रतीक्षेत उभे आहेत. मात्र सहा ते सात तास उलटूनही अनेकांना डिझेल मिळालेले नाही. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी प्रशासन आणि तेल कंपन्यांविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. तर वाशिममध्ये पेट्रोल मिळवण्याच्या नादात मारामारी झाल्याची घटना घडली आहे.

सध्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेती मशागतीला वेग आला आहे. ट्रॅक्टर, पंप आणि शेतीची इतर यंत्रे चालवण्यासाठी मोठ्या प्रमाणात डिझेलची आवश्यकता असताना अचानक निर्माण झालेल्या तुटवड्यामुळे शेतकऱ्यांचे नियोजन कोलमडले आहे. उन्हाच्या तीव्र झळांमध्ये अनेक शेतकरी उपाशीपोटी कॅन घेऊन रांगेत उभे असल्याचे चित्र गोरेगाव येथे पाहायला मिळत आहे. डिझेलअभावी शेतीची कामे ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने तातडीने डिझेल पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

परभणी शहरासह जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून इंधन टंचाई निर्माण झाली आहे. अनेक पेट्रोल पंपांवर डिझेल आणि पेट्रोल उपलब्ध नसल्याने इंधन उपलब्ध नाही असे फलक लावून पंप बंद ठेवण्याची वेळ आली आहे. कंपन्यांकडून वेळेवर इंधनपुरवठा होत नसल्यामुळे पेट्रोल पंप चालकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, पेट्रोल–डिझेलचे वाढते दर आणि त्यातच इंधनाचा तुटवडा यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वाहनधारकांना अनेक किलोमीटर फिरूनही इंधन मिळत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. सकाळपासून काही पंपांवर वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसून आले. सरकारने पेट्रोल–डिझेलचे दर वाढवले, आता तरी पुरवठा सुरळीत करा. इंधनच मिळत नसेल तर आम्ही करायचं काय? असा सवाल संतप्त परभणीकरांनी उपस्थित केला आहे. विशेषतः शेतकरी, प्रवासी वाहतूक चालक आणि रोजंदारीवर काम करणाऱ्यांना या टंचाईचा मोठा फटका बसत आहे.

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे
डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# ग्रामीण पोलिसांकडून अवैध गुटखा जप्त; ३० लाख ६३ हजारांच्या मुद्देमालासह आरोपीस अटक

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – ऑपरेशन 'क्रॅक डाऊन' अंतर्गत नांदेड ग्रामीण पोलिसांनी महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला गुटखा सुगंधीत पान मसाला विक्री करण्यासाठी घेऊन जात असलेल्या आरोपीस ३० लाख ६३ हजार ६५० रुपयांच्या मुद्देमालासह अटक केली. या कारवाईबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.



जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला गुटखा व सुगंधीत पान मसाला विक्री करणाऱ्या इसमावर कारवाई करण्याचे सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने पो. स्टे. नांदेड ग्रा. येथील वरील पोलीस अधिकारी व अंमलदार हे टापरे चौक, नांदेड परिसरात पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप पांढऱ्या रंगाचे वाहन गाडेगांव रोडने बोंढार बायपास हायवेने नांदेड शहरात जाणार आहे व त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला गुटखा सुगंधित पान मसाला बेकायदेशीररित्या विक्री करण्यासाठी घेवुन जात आहेत, अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने पोलीस अधिकारी ओमकांत चिंचोलकर, पोलीस निरीक्षक पो.स्टे. नांदेड ग्रा. व्यंकट कुसमे, पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. नांदेड ग्रा.पोलीस अंमलदार मारोती पचलिंग, शंकर माळगे, धम्मपाल कांबळे, सर्व नेमणूक पो. स्टे. नांदेड ग्रामीण अंमलदार यांनी कांदा मार्केट चौक नांदेड येथे सापळा रचून महिद्रा कंपनीची बोलोरो पिकअप क्र. MH-37-T-3601 पांढऱ्या रंगाचा थांबवून पाठीमागे जावून सदर वाहन चेक करीत असतांना चालक याने पोलिसांना कट मारुन हायगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात निघून जात होता. तेव्हा त्याचा पाठलाग करुन त्यास आडविले व सदर वाहन चालकास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव, गाव विचारले असता त्याने त्याचे नांव रईस मोहम्मद अमेर मोहम्मद, वय ३१ वर्ष, व्यवसाय चालक, रा. शांतीनगर जि. अदिलाबाद राज्य तेलंगणा असे असल्याचे सांगितले. सदर पिकअप वाहनाची पाहणी केली असता त्यात महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला व मानवी शरीरास अपायकारक असलेला गुटखा एकूण किमती वाहनासह ३० लाख ६३ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. हा मुद्देमाल जप्त करुन आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने सदर आरोपींना दोन दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे.

# गोकुंद्यात ९ जुगाऱ्यांवर कारवाई; सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त

**किनवट (प्रतिनिधी)** – शहरालगतच्या गोकुंद्याच्या दत्तनगरातील एका घरासमोरील टीनपत्र्याच्या शेडमध्ये शनिवार, दि. १६ रोजी रात्री तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्या ९ प्रतिष्ठित जुगाऱ्यांवर किनवट पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत रोख ६४ हजार ९०० रुपयांसह ९ मोबाईल, ६ दुचाकी असा एकूण ४ लाख २३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



गोकुंदा परिसराच्या दत्तनगरातील गौतम येरेकार यांच्या घरासमोरील टीनपत्र्याच्या शेडमध्ये शनिवारी रात्री पत्यावर पैसे लावून जुगार खेळला, खेळविला जात असल्याची माहिती किनवट पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी टीनपत्र्याच्या शेडमध्ये तिर्रट नावाचा जुगार रंगल्याचे पोलिसांना दिसून आले. पोलिसांनी या छाप्यात नागोराव रापणवार रा. राजगड तांडा, आनंद वाढे रा. घोटी, असद खान महेबूब खान रा. शिवाजीनगर, किनवट, राम राठोड, रा. मलकापूर, किनवट, सुरेश माने रा. रामनगर, किनवट, अनिल कऱ्हाळे रा. कमठाला, दत्ता कसबे रा. घोटी, दाऊद सुलेमान चव्हाण रा. समतानगर, किनवट व गौतम येरेकार रा.गोकुंदा, किनवट यांना ताब्यात घेतले. वरील जुगाऱ्यांकडून रोख ६४ हजार ९०० रुपये, विविध कंपन्यांचे अंदाजे ७४ हजार रुपये किंमतीचे ९ मोबाईल व २ लाख ८५ हजार रुपये किंमतीच्या ६ दुचाकी जप्त केल्या. याप्रकरणी वरील ९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**मोहफूल, रसायन जप्त**

तालुक्यातील भूलजा शिवारात शनिवारी किनवट पोलिसांनी छापा टाकून ३६ हजार रुपये किंमतीचे ३ टाकी मोहफूल रसायन जप्त केले. भूलजा शिवारातील तोटरे यांच्या वीटभट्टी समोरील अंगणात पाण्याच्या दोनशे लिटरच्या तीन निळ्या रंगाच्या टाक्यांमध्ये मोहफूल तसेच रसायन साठवल्याचे पोलिसांना दिसून आले. पोलिसांनी वरील रसायन जप्त केले. याप्रकरणी बोधडी खुर्द येथील नानंग ढमाळ याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पान १ वरून...

**शिक्षण माफियांच्या मुसक्या....**

विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात लोटले गेले आहे. NEET-UG 2026 ची परीक्षा रद्द झाल्याच्या धक्क्यातून राजस्थान, दिल्ली, गोवा, उत्तर प्रदेश अशा राज्यांतून प्रामाणिक विद्यार्थ्यांनी नैराश्यातून आपले आयुष्यच संपवले, ही आत्महत्या नाही, तर या सिस्टीमने केलेला अधिकृत 'खून' आहे. वर्षानुवर्षे डोळ्यात तेल घालून, दिवस-रात्र एक करून अभ्यास करायचा, आई-वडिलांनी शेतजमीन विकून किंवा कर्ज काढून क्लासेसची फी भरायची आणि परीक्षेच्या दिवशी या शिक्षण माफियांच्या मेहेरबानीमुळे पेपर फुटतो? आणि त्यावर उपाय काय तर परीक्षा रद्द? यापेक्षा अजून किती खालची पातळी गाठणार आहे सरकार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या संपूर्ण घोटाळ्याचे धागेदोरे जेव्हा आपल्या महाराष्ट्राशी जोडले जातात, तेव्हा खरंच लाज वाटते. सीबीआय तपासातून समोर आलेली माहिती धक्कादायक आहे.

# अधिकमासामुळे लग्नसराईला ब्रेक; वाजंत्री, मंगल कार्यालयांसह संबंधित व्यवसाय थंडावले

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** – सध्या सुरू असलेल्या अधिकमासामुळे विवाह सोहळ्यांना तात्पुरता विराम मिळाला आहे. लग्नसराईवर आधारित अनेक व्यवसायांवर मंदीचे सावट पसरले आहे. परंपरेनुसार या महिन्यात विवाहासारखे शुभकार्य टाळले जात असल्याने वाजंत्री, बँड पथक, मंगल कार्यालय, केटरिंग, सजावट व्यावसायिक, फोटोग्राफर, मेहेंदी कलाकार, डीजे चालक, फूल विक्रेते तसेच वाहन व्यावसायिक यांचा व्यवसाय पूर्णपणे थंडावला आहे.

दरवर्षी लग्नसराईच्या हंगामात या व्यवसायांमध्ये मोठी उलाढाल होत असते. मात्र अधिकमासामुळे लग्न समारंभ होत नसल्याने अनेक व्यावसायिकांना आर्थिक फटका बसत आहे. विशेषतः रोजंदारीवर काम करणाऱ्या वाजंत्री व इतर कामगारांवर याचा मोठा परिणाम जाणवत आहे. अनेक मंगल कार्यालये दिवसभर ओस पडलेली दिसत असून, बँड पथकांच्या गाड्याही जागेवरच उभ्या आहेत.

व्यावसायिकांनी सांगितले की, लग्नसराईच्या दिवसांतच आमचा मुख्य व्यवसाय चालतो. सध्या बुकिंग नसल्याने उत्पन्न बंद झाले आहे. आगामी शुभमुहूर्त सुरू झाल्यानंतरच पुन्हा व्यवसायाला गती मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. परंतु पुढील जून महिन्यात पावसाची शक्यता असल्याने लग्न सराई सुरू होते की नाही, पण शहरात मंगल कार्यालय असल्याकारणाने धोंड्याचा महिना संपल्यानंतर मोठ्या प्रमाणात विवाह सोहळे होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. संबंधित व्यावसायिकांना आगामी काळात व्यवसाय पुन्हा तेजीत येईल, अशी आशा आहे.



**नांदेड** – उपजिल्हा रुग्णालय वाडी (बु.) चे उद्घाटन येत्या ३१ मे रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी आ. बालाजी कल्याणकर यांनी शहरातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक घेतली. यावेळी गंगाधर बडुरे, उमेश मुंडे, राजेश चव्हाण, गणेश पाटील, माधुरी धुळेकर, दीपा थोरवट, संदीपसिंघ गाडीवाले, गणेश बोकारे, धनंजय पावडे, श्याम कोकाटे, मीनाक्षी सूर्यवंशी, लता शेळके तसेच नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते. **(छाया : करणसिंह बैस)**

# दहावी व बारावीच्या जुन-जुलै परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी जून-जुलै २०२६ मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (१०वी) या दोन्ही परीक्षांची अंतिम वेळापत्रके आपल्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केली आहेत.

या वेळापत्रकानुसार इयत्ता बारावीची लेखी परीक्षा मंगळवार, दि. १६ जून ते बुधवार, दि. १८ जुलै २०२६ पर्यंत तर इयत्ता दहावीची लेखी परीक्षा मंगळवार, दि. १६ जून ते मंगळवार, दि. ३० जून २०२६ या कालावधीपर्यंत चालणार आहे. तसेच इयत्ता बारावीची प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन तथा एनएसक्यूएफ अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा मंगळवार, दि. १६ जून ते बुधवार दिनांक ८ जुलै २०२६ या कालावधीत पार पडणार आहे, तर इयत्ता दहावीची प्रात्यक्षिक परीक्षा मंगळवार, दि. १६ जून ते मंगळवार, दि. ३० जून या कालावधीत घेण्यात येईल.

बोर्डाशी संलग्न असणाऱ्या सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये संबंधित वेळापत्रक छापील स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या शाळा अथवा कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधून परिक्षेच्या वेळापत्रकाची खात्री करून घेण्याचे आवाहन मंडळाने केले आहे.

पान १ वरून...

**जिल्ह्यात निवडणुकीतील भाजपची विजयी...**

प्रत्येक कार्यकर्त्याला पक्षाची ध्येयधोरणे माहिती असणे आवश्यक आहे. केंद्र आणि राज्य सरकारने सुरू केलेल्या विविध लोकोपयोगी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रामाणिकपणे पोहोचवणे हेच प्रत्येक भाजप कार्यकर्त्याचे मुख्य कर्तव्य असायला हवे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

उद्घाटनानंतर सकाळी ११ वाजता अभियानातील पहिल्या सत्राला सुरुवात झाली. यामध्ये खा. अशोकराव चव्हाण यांनी कार्यकर्ता 'विकास संभाल और अपेक्षाएं' या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी नांदेड भाजपाचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पांडे होते. खा. अशोक चव्हाण म्हणाले की, कार्यकर्ता हाच संघटनेचा आत्मा असून, आशा-अपेक्षांचा आदर करून संघटन बळकट करा. कारण कोणत्याही राजकीय पक्षाची ताकद ही त्याच्या पदाधिकाऱ्यांवर नाही, तर तळागाळातील समर्पित कार्यकर्त्यांवर अवलंबून असते. पक्षाची ध्येयधोरणे आणि पं. दीनदयाल उपाध्याय यांचा 'अंत्योदय' (समाजातील शेवटच्या घटकाचा विकास) हा विचार घराघरांपर्यंत पोहोचवण्याचे मुख्य काम कार्यकर्ता करतो. त्यामुळे बदलत्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीनुसार कार्यकर्त्यांनी आपले वक्तृत्व, जनसंपर्क आणि कौशल्य यामध्ये सातत्याने सुधारणा करण्याचेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

या अभियानाच्या माध्यमातून बदलत्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीनुसार कार्यकर्त्यांनी आपले वक्तृत्व, जनसंपर्क आणि कौशल्य यामध्ये सातत्याने सुधारणा केली पाहिजे. 'नमो ॲप', 'सरल ॲप' आणि सोशल मीडिया यांसारख्या आधुनिक डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करून कार्यकर्त्यांनी जनतेशी थेट संवाद साधावा, असे आवाहनही खा. अशोकराव चव्हाण यांनी केले. पक्षात काम करणाऱ्या प्रत्येक ज्येष्ठ आणि नवोदित कार्यकर्त्याला योग्य तो सन्मान आणि आदर मिळाला पाहिजे. कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात पक्षातील नेतृत्वाने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे. जुन्या जाणत्या अनुभवी नेत्यांनी आणि नवीन तरुण कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन परस्पर समन्वयाने काम केल्यास पक्ष अधिक गतिमान होईल, असेही खा. अशोकराव चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे.

**मजबूत पक्ष बांधणीसाठी शिबीर –अमरनाथ राजूरकर**

भाजपची मूळ विचारधारा, केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मजबूत पक्ष बांधणी करणे हा या शिबिराचा मुख्य हेतू असल्याचे आयोजक अमरनाथ राजूरकर यांनी प्रास्ताविकमध्ये सांगितले.

**कार्य विस्तार करणे आवश्यक – डॉ. भागवत कराड**

शिबिराच्या तिसऱ्या सत्रामध्ये डॉ. भागवत कराड यांनी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी आणि भाजपची विचारधारा तळागाळातील प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'कार्य विस्तार' करणे अत्यंत आवश्यक आहे, बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत कार्यकर्त्यांनी जनतेशी थेट संपर्क कसा वाढवावा, याबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण टिप्स दिल्या आहेत.

**व्यावहारिक बाबी समजावून घेण्याची गरज – चित्रा वाघ**

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करताना प्रभावी संवादकौशल्य आणि जनतेशी असलेला सकारात्मक संवाद हाच पक्षाचा खरा पाया असतो. कार्यकर्त्यांनी संघटनात्मक कार्यात समन्वय राखत, सार्वजनिक जीवनात वावरताना शिस्त आणि वर्तनाला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. राजकारणात काम करत असताना येणाऱ्या व्यावहारिक अडचणी, लोकांचे प्रश्न सोडवण्याची पद्धत आणि शासनाच्या कल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत कशा पोहोचवायच्या, या व्यावहारिक बाबी कार्यकर्त्यांनी समजवून घेणे गरजेचे असल्याचे मत भाजपाच्या महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आ. चित्रा वाघ सांगितले.

**ICEYE भारतात उपग्रह उत्पादन सुरू करणार....**

दोन्ही प्रवाह प्रकर्षाने जाणवतात. अलीकडच्या जागतिक युद्धांमधून देश हे शिकत आहेत की, अंतराळ हीच गुप्तचर आणि संरक्षणासाठी पुढची सीमा आहे. आम्ही या क्षेत्रात तज्ज्ञ असल्याने भारताकडे आमची एक महत्त्वाची बाजारपेठ म्हणून पाहतो.

**वर्षाला ४० उपग्रह तयार करण्याचे लक्ष्य :** कंपनीने भारतातील गुंतवणुकीचा अचूक आकडा अद्याप जाहीर केलेला नाही, मात्र ही गुंतवणूक कोट्यवधी डॉलरच्या घरात असण्याची शक्यता आहे.

# लोहा शहरात एकाच वेळी तीन लॉजवर छापे

**नांदेड (प्रतिनिधी)** –लोहा शहरातील अवैध व्यवसायांवर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कंधार आणि लोहा पोलिसांनी मोठी कारवाई करीत तीन लॉजवर छापे टाकले. या कारवाईत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा, भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये तब्बल १० आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे लोहा शहरात मोठी खळबळ उडाली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गोपनीय माहितीच्या आधारे १६ मे रोजी सायंकाळी लोहा शहरातील निलय लॉज येथे छापा टाकण्यात आला. या वेळी लॉजमध्ये सुरू असलेल्या अवैध वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश झाला. पोलिसांनी लॉजमधील तीन महिलांची सुटका केली असून घटनास्थळी काहीजण मद्यपान करीत असल्याचेही आढळून आले. या प्रकरणी रामकिशन विठ्ठलराव ढगे (वय ४७, व्यवसाय-लॉजिंग), गुलाब रशीद शेख, सोमनाथ गंगाधर जंगले, बालाजी दत्ता जाधव, आनंद प्रकाश श्रीमंगले, शिलानंद कमलाकर वारकरे यांच्यासह इतर आरोपींविरुद्ध लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध अधिनियमासह विविध कलमांखाली कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, लोहा शहरातील रणवीर लॉज व आर्या लॉज यांच्यावरही पोलिसांनी कारवाई केली. या लॉजमध्ये येणाऱ्या ग्राहकांची नोंद न ठेवणे, ओळखपत्र न घेता खोल्या भाड्याने देणे अशा नियमभंगाच्या प्रकारांचा उलगडा झाला.

याप्रकरणी रणवीर लॉजचे मालक बालाजी सदाशिव जाधव व मॅनेजर रफिक अमीर शेख तसेच आर्या लॉजचे मालक अजय मारोती भिसे व मॅनेजर माधव गणेश कंधारे यांच्याविरुद्ध स्वतंत्र दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईदरम्यान देशी व विदेशी दारूसह सुमारे ३ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पथकाचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी कौतुक केले.

# ऑपरेशन क्रॅकडाऊन : पंधरा दिवसांत ३१३ गुन्हे दाखल करून ५५४ आरोपींना केली अटक, साडेपाच कोटींचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –ऑपरेशन क्रॅकडाउन अंतर्गत दि. ३० एप्रिल ते १५ मे दरम्यान अवैध जुगार, मटका, दारु, एन.डी.पी.एस, आर्म ॲक्ट, गुटखा, रेती व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करून ३१३ गुन्हे दाखल करत ५५४ आरोपींवर अटकेची कारवाई केली. एवढेच नाही तर त्यांच्याकडून ५ कोटी ४६ लाख ७९ हजार १० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच भारतीय न्याय संहितेतील कलम १११,११२ अन्वये संघटित गुन्हेगारी अंतर्गत प्रथमच कारवाई करण्यात आल्याने गुन्हेगारांच्या मनात धडकी भरली आहे.

जिल्ह्यातील अवैध व्यवसाय, वाढती गुन्हेगारी तसेच सराईत गुन्हेगारांवर प्रभावी प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ३० एप्रिल २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत ऑपरेशन क्रॅकडाऊन ही विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेद्वारे जिल्हाभरात गुन्हेगारी प्रवृत्तीविरोधात कठोर आणि धडक कारवाई करत नांदेड पोलिसांनी गुन्हेगारांमध्ये मोठा धाक निर्माण केला आहे.

ऑपरेशन क्रॅकडाऊन दरम्यान अवैध व्यवसाय करणारे, पाहिजे आरोपी, सराईत गुन्हेगार, वारंवार कायदा मोडणारे तसेच समाजात दहशत निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर मोठ्या प्रमाणात कायदेशीर कारवाई करण्यात आली. जिल्ह्यात विविध ठिकाणी अचानक धाडी, नाकाबंदी, संशयितांची तपासणी, रात्री विशेष गस्त तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून गुन्हेगारांची माहिती संकलित करून कारवाया करण्यात आल्या.

विशेष म्हणजे, नव्याने लागू झालेल्या भारतीय न्याय संहितामधील कलम १११ संघटित गुन्हेगारीचा नांदेड जिल्ह्यात प्रथमच प्रभावी वापर करण्यात आला. संघटित पद्धतीने गंभीर गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध या कठोर कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच भारतीय न्याय संहितेतील कलम ११२ किरकोळ संघटित गुन्हेगारी अंतर्गतही प्रथमच कारवाई करण्यात आली. किरकोळ स्वरूपाचे परंतु संघटित पद्धतीने वारंवार होणारे गुन्हे, नागरिकांना त्रास देणाऱ्या टोळ्या तसेच परिसरातील अवैध हालचालींवर या कलमांतर्गत प्रभावी कारवाई करण्यात आली. त्यामुळे छोट्या-मोठ्या गुन्हेगारी साखळ्यांवरही पोलिसांनी कठोर नजर ठेवली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

ऑपरेशन क्रॅकडाऊनमुळे अवैध दारू विक्री, जुगार, मटका, अवैध वाहतूक, शस्त्र बाळगणे तसेच इतर बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या अनेकांवर प्रतिबंधात्मक व दंडात्मक कारवाई करण्यात आली. अनेक पाहिजे आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून सराईत गुन्हेगारांवर कायद्याचा प्रभावी वचक निर्माण करण्यात नांदेड पोलिसांना यश आले आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले की, नांदेड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध आहे. गुन्हेगारी कोणत्याही स्वरूपात खपवून घेतली जाणार नाही. भविष्यातही अशाच विशेष मोहिमा अधिक प्रभावीपणे राबविण्यात येतील. नागरिकांनीही परिसरातील कोणतीही संशयास्पद हालचाल, अवैध व्यवसाय किंवा गुन्हेगारीविषयी माहिती तत्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. सुरक्षित नांदेड, गुन्हेमुक्त नांदेड या उद्दिष्टासाठी पोलीस आणि नागरिक यांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com